# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२६

-----------------------------

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०१ जुलै, २०२६ / आषाढ १०, १९४८ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | वैद्यकीय शिक्षण मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री | |
| (३) | मृद व जलसंधारण मंत्री | |
| (४) | उद्योग, मराठी भाषा मंत्री | |
| (५) | महिला व बालविकास मंत्री | |
| (६) | ग्रामविकास व पंचायत राज मंत्री | |
| (७) | कामगार मंत्री | |
| (८) | सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री | |

-----------------------------------

**प्रश्नांची एकूण संख्या - २७**

-------------------------------------

### सार्वजनिक आरोग्य विभागाने काळ्या यादीत टाकलेल्या कंपनीस निविदा प्रक्रियेत सहभागी केल्याबाबत

**(१) * ३८८१५ श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक आरोग्य विभागाने हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड (Hindustan Laboratories Limited) या कंपनीने पुरविलेल्या आयर्न सिरपच्या सुमारे ५० बॅचेस अन्न व औषध प्रशासन (FDA) विभागाने केलेल्या चाचणीत निकृष्ट, असुरक्षित व “स्लो पॉयझन” स्वरूपाच्या आढळून आल्याने संबंधित कंपनीस दोन वर्षांसाठी काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकण्यात आले, मात्र त्यानंतर अल्पावधीतच निर्णय बदलून केवळ आयर्न सिरप उत्पादनापुरतीच बंदी ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंपनीस सुमारे रु.७०० कोटींच्या समूह निविदा प्रक्रियेमध्ये पुन्हा सहभागी करून घेण्यात आले असून त्यामधून अंदाजे रु.८०ते १०० कोटींचे काम देण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी निकृष्ट आयर्न सिरप संदर्भात वारंवार लेखी इशारे दिले असून वितिरित झालेल्या ७१ हजार बाटल्यांमधील औषधांमुळे हजारो बालके व गरोदर मातांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, काळ्या यादीतील कंपनीस पुन्हा निविदा प्रक्रियेत संधी देण्यामागील कारणे काय आहेत तसेच संबंधित अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करणे, कंपनीवर कायमस्वरूपी बंदी घालणे, संबंधित मालक/व्यवस्थापनाविरुद्ध फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही प्रस्तावित आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार भविष्यात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निविदा प्रक्रियेत काळया यादीतील कंपन्यांना पुन्हा संधी मिळू नये, निकृष्ट औषध पुरवठ्यामुळे रुग्णांच्या जीवितास धोका निर्माण होऊ नये, औषध खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता राहावी व गुणवत्तेची हमी सुनिश्चित व्हावी तसेच राज्यभर वितरित औषधांचे तृतीय पक्ष लेखापरिक्षण (थर्ड पार्टी ऑडिट)करणे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड या कंपनीकडून आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली औषधीच्या एकूण १०३ बॅचेस चा पुरवठा करण्यात आला होता. पुरवठा पश्चात वापरापूर्वी NABL मानांकित प्रयोगशाळेमार्फत तपासणीमध्ये एकूण ४६ बॅचचे नमुने अप्रामाणित (Not of Standard Quality) असल्याचे अहवाल प्राप्त झाले असून अन्न व औषध प्रशासन यांनी त्यांच्या शासकीय प्रयोगशाळेत गुणवत्ता तपासणी करुन संबंधित औषधींचे ०२ समूह (बॅच) क्रमांक "अप्रमाणित" असल्याचा अहवाल दिला. सदर अहवालानुसार व निविदेतील अटीनुसार हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड या कंपनीस आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली या औषधीसाठी पुढील दोन वर्षांसाठी काळया यादीत टाकण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड या निविदा धारकास आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली या औषधी व्यक्तिरिक्त एकूण ४३ औषधांकरिता रु. २१.७९ कोटी इतक्या रक्कमेचे पुरवठा आदेश प्राधिकरणामार्फत निर्गमित करण्यात आले. तथापि, आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली या औषधीकरिता काळया यादीत टाकल्यानुसार प्रस्तुत कंपनीस निविदेत समाविष्ट करण्यात आले नाही.

(३) हे खरे नाही.

आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली या औषधीकरिता जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड यांना दि.१९/०३/२०२५ रोजी प्राधिकरणाकडून पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आल्यानंतर सदर औषधी अप्रमाणित असल्याबाबत प्रयोगशाळांकडून अहवाल प्राधिकरणास प्राप्त होताच प्राधिकरणाने सदर साठा गोठवण्याबाबत जिल्हा आरोग्य अधिकारी रायगड यांना दि. ०२/०९/२०२५ च्या पत्रान्वये कळविले होते.

(४) हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड कंपनीस ई-१५९ या निविदेअंतर्गत आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली बॉटल्स औषधीस अप्रमाणित घोषित केल्यानुसार प्रस्तुत औषधीकरिता काळया यादीत टाकण्यात आले आहे. त्यानुसार पुढील निविदेमध्ये आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली बॉटल्स या औषधी व्यक्तिरिक्त इतर औषधींसाठी त्यांना निविदेमध्ये सहभागी करून घेणे क्रमप्राप्त होते. सन २०२५-२६ या वर्षामधील प्राप्त प्रशासकीय मान्यतेनुसार औषधीसाठी ई-२१५ या निविदेमध्ये हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड कंपनीस आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली बॉटल्स या बाबीकरिता प्राधिकरणामार्फत संधी देण्यात आलेली नाही.

तसेच आयर्न फोलिक ॲसिड ५० मिली या औषधीसाठी हिंदुस्तान लॅबोरेटरीज लिमिटेड या कंपनीस पुढील दोन वर्षांसाठी काळया यादीत टाकल्याबाबतचे आदेश प्राधिकरणाने संकेत स्थळावर प्रसिध्द केले असून देशातील इतर औषधी महामंडळांना देखील मेलद्वारे अवगत करून देण्यात आले आहे.

सद्य:स्थितीत महाराष्ट्र वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणामार्फत एकूण ०७ NABL मानांकित प्रयोगशाळांचे पॅनल करण्यात आले असून औषधीचा पुरवठा झाल्यानंतर प्रत्यक्ष वापरापूर्वी प्रयोगशाळा चाचणीद्वारे प्रमाणित असल्याचे खात्री करुनच औषधी वापरासाठी परवानगी दिली जाते. त्यामुळे सद्य:स्थितीत वितरीत औषधांचे थर्ड पार्टी ऑडिट करण्याची बाब प्राधिकरणामार्फत प्रस्तावित नाही.

(५) गुणवत्ता पूर्ण औषधांचा पुरवठा करण्याकरिता निविदेमध्ये फक्त मूळ उत्पादक यांनाच सहभागी करून घेण्यात येते. निविदाकारांची पात्रतेपूर्वी जागतिक आरोग्य संघटनेच्या निकषानुसार Good Manufacturing Practices (WHO-GMP) प्रमाणपत्र व त्यानुसार परवाना दिलेली औषधांची यादी इत्यादी कागदपत्रांची पडताळणी करण्यात येते. तांत्रिक व आर्थिक पात्रतेचे निकष पूर्ततेनंतरच निविदाकारांची पात्रता अंतीम करण्यात येते. तसेच निर्गमित केलेल्या पुरवठा आदेशांतील औषधांची पुरवठा पश्चात प्रत्यक्ष वापरापूर्वी NABL मानांकित प्रयोगशाळा मार्फत गुणवत्ता चाचणी करण्यात येते. प्रयोगशाळेकडून अप्रमाणित (Not of Standard Quality) अहवाल प्राप्त झाल्यास सदर औषधांची तपासणी अन्न व औषध प्रशासन विभागाकडून करण्यात येते. अन्न व औषध प्रशासन विभागाकडून अप्रमाणित अहवाल प्राप्त झाल्यास सदरचा साठा विहित पद्धतीचा अवलंब करून नष्ट करण्यात येतो. प्रमाणित अहवाल (Standard Quality) प्राप्त झालेल्या औषधींनाच वापरण्यासाठी परवानगी दिली जाते.

गुणवत्ता हमी कार्यक्रमातंर्गत औषधांची NABL मानांकित प्रयोगशालांकडून तपासणी केल्यानंतर औषधांचा सक्रीय घटकाच्या (API) कमी-जास्त प्रमाणानुसार अहवाल प्रमाणित/अप्रमाणित घोषित करण्यात येतो. या परिमाणानुसार औषधीच्या तीन किंवा तीनपेक्षा जास्त बॅचेस अप्रमाणित आढळून आल्यास संबंधित औषधीकरिता उत्पादकास काळया यादीत टाकण्यात येते. तसेच औषधाची एकही बॅच बनावट (Spurious), भेसळयुक्त (Adulterated) तथा खोटी माहिती दर्शवून (Misbranded) पुरवठा केल्यास उत्पादकास काळया यादीत टाकण्यात येते.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात विनापरवाना सुरु असलेल्या आयव्हीएफ केंद्रांवर कारवाई करणेबाबत**

**(२) * ३२८३१ श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बदलापूर, अंबरनाथ (जि.ठाणे ) येथे स्त्रीबीज तस्करीचे रॅकेट उघडकीस आले असून सदर प्रक्रिया कोणत्याही तज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीशिवाय किंवा अधिकृत हॉस्पिटल एवेजी खाजगी प्लॉटमध्ये अत्यंत अशास्त्रीय पद्धतीने केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अत्यंत गरीब महिलांना रु.१५ ते २० हजार इतके किरकोळ आमिष दाखवून त्यांच्या शरीराचा व्यापार केला जात असून मध्यस्थ महिलांकडून लाखो रुपयांचे व्यवहार करत मूळ पिडीत महिलेला तुटपुंजी रक्कम दिली जात असल्याचे ही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्त्रीबीज तस्करी प्रकरणात नाशिक येथील मुंबई नाका येथील मालती आयव्हीएफ सेंटरचा सहभाग असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आल्याने नाशिक शहरातील १२१ गर्भपात आणि ४२४ सोनोग्राफी केंद्रांची तपासणी करण्याचे निर्देश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, चंद्रपूर शहरातील नामांकित बेबीश्युअर आणि इंदिरा आयव्हीएफ या दोन केंद्रानी शासनाचे नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यापूर्वीच अवैधरित्या सेवा सुरु केली असून रुग्णांसह नागरिकांची फसवणूक सुरु केली असल्याचे दिनांक १ मे, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, प्रजनन तंत्रज्ञान सहाय्यक कायदा, २०२१ नुसार कोणतीही आयव्हीएफ सेवा सुरु करण्यापूर्वी रीतसर नोंदणी अनिवार्य असते, मात्र नियमांची पायमल्ली करुन या केंद्रानी आपला व्यवसाय सुरु केला असल्याने आरोग्य विभागाने दिनांक २३ मार्च,२०२६ रोजी या दोन्ही केंद्रावर धाड टाकून तपासणी केली असून त्याबाबतचा अहवाल दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी महानगर पालिका,चंद्रपूर येथे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, या गंभीर प्रकरणांची शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबधित दोषी आयव्हीएफ केंद्रावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

बदलापूर परिसरात एका महिलेकडून एजंटमार्फत गरजू महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून स्त्रीबीज काढून विक्री करण्याचा बेकायदेशीर व्यवसाय चालविला जात असल्याची माहिती पोलीस यंत्रणेस मिळाली. त्यानुसार दिनांक १९/०२/२०२६ रोजी वैद्यकीय अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, बदलापूर आणि बदलापूर (पूर्व) पोलीस ठाणे यांच्या संयुक्त पथकाने तपास केला. पोलीसांमार्फत करण्यात आलेल्या तपासात महिलांना रु १८,००० ते रु २५,०००/- इतक्या पैशांचे आमिष दखवून त्यांचे स्त्रीबीज घेण्यात येत असल्याचे तपासात आढळून आले आहे.त्यामुळे पोलीस ठाणे , बदलापूर येथे गुन्हा रजि.नं.६८/२०२६ दाखल केला आहे.

(३) सदर स्त्रीबीज तस्करी प्रकरणात नाशिक येथील मुंबई नाका येथील मालती आयव्हीएफ सेंटरचा सहभाग आढळून आल्याने राज्यातील सोनोग्राफी आणि केंद्रांमार्फत गर्भधारणापूर्व व प्रसवपूर्व निदान तंत्रे (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ व वैद्यकीय गर्भपात कायदा १९७१ चे उल्लंघन होत नसल्याची खात्री करण्यासाठी दिनांक १६ एप्रिल ते १५ मे,२०२६ दरम्यान संपूर्ण राज्यात सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची धडक तपासणी मोहिम राबवून तपासणी करण्यात आली आहे.

(४), (५) व (६) चंद्रपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बेबीश्युअर क्लिनिक व इंदिरा आय.व्ही.एफ केंद्रांची परिमंडळस्तरीय तज्ञ समितीमार्फत दिनांक २३/०३/२०२६ रोजी केलेल्या तपासणीमध्ये सदर दोन्हीही केंद्रात बऱ्याच त्रुटी आढळून आल्या व दोन्ही केंद्रांनी एआरटी लेवल-१ ची रितसर नोंदणी मिळण्यापूर्वीच कामे सुरु केले असल्याचा अहवाल तज्ञ समितीने समुचित प्राधिकरी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका चंद्रपूर यांना दिनांक १ एप्रिल, २०२६ रोजी पाठविला असून राज्य स्तरावरुन एआरटी लेवल- १ ची नोंदणी मिळेपर्यंत काम त्वरीत थांबविण्याबाबत ताकीद देवून खुलासा सादर करण्याबाबत कळविले असून या दोन्ही केंद्रांचा खुलासा प्राप्त झालेला आहे. या खुलाश्यानुसार कार्यवाही सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीत बेबीश्युअर क्लिनिक व इंदिरा आय.व्ही.एफ केंद्र यांनी न्यायालयात प्रकरण दाखल केले असून सदर प्रकरण मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे न्यायप्रविष्ट आहे.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुल व राजूरा (जि.चंद्रपूर ) येथील रुग्णालयातील रिक्त पदे भरणेबाबत

**(३) * ३२६३४ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.देवराव भोंगळे (राजूरा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुल (जि.चंद्रपूर) येथील उपजिल्हा रुग्णालयात केवळ २ नियमित वैद्यकीय अधिकारी व २ कंत्राटी वैद्यकीय अधिकारी कार्यरत असून त्यापैकी एका अधिकाऱ्याकडे अधीक्षक पदाचा अतिरिक्त प्रभार देण्यात आलेला असून स्त्रीरोगतज्ञ, दंत शल्यचिकित्सक, अस्थीरोग तज्ञ, दंत शल्यचिकित्सक यांची पदे रिक्त असल्यामुळे रुग्णालयातील आरोग्य सेवेवर त्याचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुल व राजुरा येथील उपजिल्हा रुग्णालयात क्ष-किरण तज्ञ (रेडिओलॉजिस्ट) उपलब्ध नसल्याने सोनोग्राफी सेवा उपलब्ध होत नसल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजुरा उपजिल्हा रुग्णालयात कोरपना, जिवती, गोंडपिंपरी आदी तालुक्यांतील रुग्ण उपचारासाठी येत असून, विशेषतः गर्भवती महिला व गंभीर रुग्णांना सोनोग्राफीसाठी चंद्रपूर किंवा खाजगी केंद्रांवर जावे लागत असल्याने आर्थिक व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित उपजिल्हा रुग्णालयात सोनोग्राफी तज्ञाचे पद दीर्घकाळ रिक्त राहण्याची कारणे काय आहेत,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार सदर उपजिल्हा रुग्णालयातील रिक्त पदे तातडीने भरणे तसेच नियमित सोनोग्राफी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे नाही.

उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे वैद्यकीय अधिक्षक यांचे १ पद मंजुर असून सदर पद भरलेले आहे. तसेच वैद्यकीय अधिकारी यांची ७ पदे मंजूर असून ३ पदे भरलेली आहेत व ४ पदे रिक्त आहेत.०३ कंत्राटी (एमबीबीएस) वैद्यकीय अधिकारी यांची पदे भरलेली आहेत व १ अस्थिरोगतज्ञ यांची सेवा संलग्न करण्यात आली आहे.

स्त्रीरोगतज्ञ यांचे रिक्त पदावर २ स्त्रीरोगतज्ञ IPHS मधून, १ ऑनकॉल व १ पूर्णवेळ घेण्यात आले आहे.

दंतशल्य चिकित्सक पद रिक्त झाल्यामुळे मुल येथून जवळ असलेल्या ग्रामीण रुग्णालय, सिंदेवाही येथील दंतशल्य चिकित्सक यांची सेवा आठवड्यातून दोन दिवस उपजिल्हा रुग्णालय, मुल येथे संलग्न करण्यात आलेली आहे.

पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केलेले डॉ. आसुटवार यांना या रुग्णालयात तात्पुरती पदस्थापना देण्यात आलेली आहे.

उप जिल्हा रुग्णालय, मुल येथे नियमित वैद्यकीय अधिकारी, कंत्राटी वैद्यकीय अधिकारी तसेच सेवा संलग्न असलेल्या व विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी यांची संख्या एकूण ११ असून त्यांच्यामार्फत रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांवर आवश्यक ते उपचार करण्यात येत आहेत. त्यामुळे रुग्णसेवेवर विपरीत परीणाम होत नाही.
(२) हे खरे नाही. उपजिल्हा रुग्णालय, मुल व राजुरा येथे क्ष-किरण तज्ञ ही पदे मंजुर नाहीत.

तथापि, रुग्णांना सोनोग्राफी सेवा मिळण्याचे दृष्टीने उप जिल्हा रुग्णालय, मुल येथे क्ष-किरण तज्ञ यांची सेवा बुधवार आणि शुक्रवार उसनवारी तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत. उप जिल्हा रुग्णालय राजुरा येथे क्ष-किरण तज्ञ यांची सेवा बुधवारी IPHS तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत.
(३) हे खरे नाही.
(४) आकृतीबंधामध्ये उप जिल्हा रुग्णालय, मुल व राजुरा येथे क्ष-किरण तज्ञ ही पदे मंजुर नाहीत.
(५) महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ संवर्गातील वैद्यकीय अधिकारी (वेतनस्तर एस-२०) यांची एमबीबीएस तसेच विशेषज्ञ मधील एकूण १४४० रिक्त पदांची जाहिरात दि.२७/०२/२०२६ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही चालू आहे.

उप जिल्हा रुग्णालय, मुल व राजुरा येथे क्ष-किरण तज्ञ ही पदे मंजूर नाहीत. तथापी रुग्णांना सोनोग्राफी सेवा मिळण्याचे दृष्टीने उपजिल्हा रुग्णालय मुल येथे क्ष-किरण तज्ञ यांची सेवा बुधवार आणि शुक्रवार उसनवारी तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत. उपजिल्हा रुग्णालय राजुरा येथे क्ष-किरण तज्ञ यांची सेवा बुधवारी IPHS तत्वावर घेण्यात आलेल्या आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील ग्रामपंचायत संगणक परिचालकांच्या प्रलंबित मागण्यांबाबत

**(४)* ३६१८२ श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सुमारे २८ हजार ५०० ग्रामपंचायतींमध्ये जवळपास २० हजार कार्यरत संगणक परिचालक मागील १४ वर्षांपासून अत्यल्प मानधनावर सेवा करित आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित संगणक परिचालकांना अनेक ठिकाणी चार ते सहा महिने मानधन मिळत नसल्याने आर्थिक अडचणी निर्माण झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ग्रामपंचायतीकडून मानधन न मिळाल्यास शासनाकडून मानधन देण्याची हमी दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी वा त्यादरम्यान झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत देण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यावलकर समितीच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायत संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याची शिफारस करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सध्या मिळणारे रु.१०हजार मानधन अपुरे असून ते किमान रु.१७ हजार इतके करण्याची मागणी शासनाकडे प्रलंबित असून संबंधित परिचालकांना नोकरीची सुरक्षा, प्रसूती रजा, अपघात व आरोग्य विमा तसेच नवीन संगणक, प्रिंटर व आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर ग्रामपंचायत संगणक परिचालकांना कर्मचारी दर्जा, नियमित मासिक मानधन, किमान वेतन, रु.५० लाख विमा संरक्षण व इतर प्रलंबित मागण्या मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे :** (१) व (२) आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) प्रकल्पांतर्गत केंद्रचालक यांना सध्या १०,०००/- रु. इतके मानधन अदा करण्यात असून त्यांचे माहे मार्च, २०२६ पर्यंतचे मानधन प्रदान करण्यात आलेले आहे तसेच प्रलंबित मानधन लवकरच अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे .

(३), (४), (५) व (६) यावलकर समिती ही ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढ व आकृतिबंध सुधारित करण्यासाठी गठीत केली असून या समितीने संगणक परिचालकांना/केंद्र चालकांना ग्रामपंचायतीमध्ये सामावून घेऊन ग्रामपंचायत कर्मचारी दर्जा व किमान वेतन देण्याबाबत कोणतीही शिफारस केलेली नाही.

केंद्र चालक हे ग्रामोद्योजक (village level Entrepreneur) म्हणून काम करत असून नागरिकांना विविध प्रकारच्या B२C सेवा उपलब्ध करुन दिल्यास त्यांना अतिरिक्त मोबदला प्राप्त होतो. केंद्र चालकांना ग्रामपंचायतींच्या कामांसाठी अधिकचे सहाय्य म्हणून प्रतिमाह रु.१०,०००/- इतके मानधन देण्यात येते.

केंद्र चालकांच्या मानधनात प्रकल्प सुरु झाल्यापासून आतापर्यंत २ वेळा मानधन वाढ करण्यात आली आहे.

केंद्र चालकांच्या विविध मागण्यांसंदर्भात त्यांच्या संघटनांसोबत मा. मंत्री (ग्रामविकास ) यांच्याकडे दि. २१/०१/२०२५, दि. २४/०२/२०२६ व दि. ०६/०३/२०२६ रोजी बैठका घेतल्या आहेत. केंद्र चालकांच्या मागण्या तपासण्यात येत आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील शासकीय परिचर्या प्रशिक्षण विद्यालयामधील विद्यार्थिनींना विषबाधा झाल्याबाबत

**(५) * ३५१८० श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्हयातील जिल्हा सामान्य रुग्णालय अंतर्गत (केटीएस) येणाऱ्या शासकीय परिचर्या प्रशिक्षण विद्यालयामधील (नर्सिंग कॉलेज) ४५ विद्यार्थिनींना विषबाधा झाली असल्याचे माहे मार्च, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थिनींना जेवण पुरवणाऱ्या कॅन्टीन मधील अन्न व पाण्याचे नमुने तपासण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विषबाधा कोणत्या माध्यमातून झाली हे तपासाअंती अहवालातून स्पष्ट झाले आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार विद्यार्थिनींना देण्यात येणाऱ्या जेवणाची वेळोवेळी तपासणी करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) सदर घटनेच्या अनुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, केटीएस सामान्य रूग्णालय, गोंदिया यांनी गठीत केलेल्या त्रिस्तरीय चौकशी समिती तसेच अन्न व औषध प्रशासन, गोंदिया कार्यालय यांच्या अहवालानुसार विद्यार्थीनींना देण्यात आलेल्या अन्नातुन विषबाधा झाल्याचे आढळून आलेले नाही.

तसेच परिचर्या प्रशिक्षण विद्यालय, गोंदिया येथील वसतिगृहामध्ये विद्यार्थिनींना देण्यात येणाऱ्या जेवणाची व पाण्याची वेळोवेळी तपासणी करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतंर्गत बंधारे बांधण्याच्या कामामध्ये झालेली अनियमितता

**(६) * ३२५१४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्हयातील मृद व जलसंधारण विभागाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत कंपोझिट गॅम्बियन बंधारे बांधणेच्या काम वाटपामध्ये नियमबाह्यपणे कंत्राटदारांना कामाचे वाटप करून अनियमितता केल्याप्रकरणी चौकशी करून दोषीविरूद्ध कारवाई करणे बाबतची तक्रार लोकप्रतिनिधी यांनी सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांना दिनांक २२ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ४३ कामाच्या निविदेचे (जास्त खपाच्या) दैनिकांमध्ये जाहिरात न देणे, कार्यालयात स्थाई निविदा लिपिक असतांना सुद्धा कंत्राटी पद्धतीने कार्यरत असलेल्या संगणक प्रशासकाकडे निविदा प्रक्रियेचे काम देणे, निविदा प्रक्रिया सीसीटीव्ही देखरेखीखाली न राबविणे, निविदा अर्ज देतांना आणि घेतांना त्याची नोंद कार्यालयाच्या प्रमाणित आवक/जावक रजिस्टर मध्ये न घेणे, एकाच नोटीस मधील तीन कामे एकाच कंत्राटदाराला देणे अशा अनेक अनियमितता झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

१. उपरोक्त नमूद ४३ कामांना मा.अध्यक्ष जिल्हा पाणलोट कक्ष तथा माहिती केंद्र (WCDC) तथा जिल्हाधिकारी, अकोला यांचेकडून दिनांक १६/१०/२०२५ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून कामांच्या निविदेच्या जाहिराती प्रचलित रोस्टर पद्धतीने जिल्हा माहिती अधिकारी, अकोला यांनी वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्या आहेत.

२. सदर ४३ कामांची निविदा प्रक्रिया कार्यालयीन निविदा लिपीक यांनीच पूर्णपणे पार पाडली असून निविदा लिपिकास सहाय्यक म्हणून PMKSY अंतर्गत कार्यरत असलेल्या संगणक प्रशासक यांनी काम केले आहे.

३. ४३ कामांचे निविदा अर्ज देतांना आणि घेतांना त्याची नोंद कार्यालयाच्या आवक/जावक रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली आहे.

४. ४३ कामांची निविदा सूचना प्रसिध्द केलेनंतर प्राप्त निविदाधारकांपैकी प्राप्त कंत्राटदाराचे तांत्रिक व आर्थिक लिफाफा उघडून नुन्यतम दर (L१) असलेल्या कंत्राटदारांनाच कामाचे कार्यारंभ आदेश हे नियमानुसार पाणलोट समिती व प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा यांच्यामार्फत देण्यात आले आहेत.

५. प्रचलित नियम व मार्गदर्शक सुचनांस अनुसरून सर्व निविदा प्रक्रिया पारदर्शकतेने राबविण्यात आल्या असून,पात्र कंत्राटदारांना नियमांनुसार संधी देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळासाठी नियमित संचालक मंडळ नियुक्त करणेबाबत

**(७) * ३७९९३ श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ नुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना करण्यात आली असून राज्यातील सुमारे ६० लाखांहून अधिक आस्थापनांची नोंदणी मंडळाकडे आहे तसेच मंडळास दरवर्षी सुमारे रु.२०० रुपये कोटी इतका निधी प्राप्त होत असल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मंडळास सन २०१४ पासून नियमित संचालक मंडळ नसल्याने तसेच विविध कामगार कल्याण मंडळांमध्ये सुमारे ४० टक्के पदे रिक्त असल्यामुळे कामगारांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीकडे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मागील पाच वर्षांत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे जमा झालेला निधी व त्यातून करण्यात आलेला खर्च याची विभागनिहाय माहिती काय आहे,
(४) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर मंडळासाठी नियमित संचालक मंडळ नियुक्त करणे, रिक्त पदे भरणे याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ मधील कलम ४ अन्वये महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाची स्थापना झालेली असून सद्य:स्थितीत एकूण १९०३९९ आस्थापना मंडळाकडे नोंदीत आहेत. तसेच सन २०२५-२६ या कालावधीत मंडळाला रु.१९८.२१ कोटी कल्याण निधी प्राप्त झालेले आहे.

(२) सद्य:स्थितीत महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अस्तित्वात नाही. तथापि, मंडळ पुनर्घटीत करीपर्यंत, कामगार कल्याण निधीचे प्रशासन करणे व मंडळाची कार्ये पार पाडण्यासाठी शासनाने महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम, १९५३ मधील कलम १८(२) अन्वये मंडळाचे अधिकार आणि कार्ये पार पाडण्यासाठी उप-सचिव, कामगार-१० , कामगार विभाग, मंत्रालय यांची नियुक्ती केली आहे.

(३) मागील पाच वर्षात जमा व खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे :

| सन | जमा निधी (रु. कोटी) | खर्च (रु. कोटी) |
|---|---|---|
| २०२१-२२ | ७९.६२ | ६८.४६ |
| २०२२-२३ | ९४.७८ | ८७.२० |
| २०२३-२४ | १०७.३१ | ९१.७५ |
| २०२४-२५ | १७२.७२ | १२४.९२ |
| २०२५-२६ | १९८.२१ | ११८.९९ |

(४) मंडळाचे पुनर्घटन करणे ही बाब शासनाच्या विचाराधीन असून मंडळातील रिक्त पदे भरण्यासाठी विविध प्रशासकीय बाबींचा आढावा घेऊन कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील रक्तपेढ्यांमधील रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती दररोज संकेतस्थळावर प्रसिद्ध करणेबाबत**

**(८) * ३२४९६ श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.सुहास (आण्णा) व्दारकानाथ कांदे (नांदगाव), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.तुकाराम काते (चेंबूर), श्री.विलास भुमरे (पैठण), श्री.सुनील राऊत (विक्रोळी), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.चंद्रदीप नरके (करवीर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे यासाठी सर्व रक्तपेढ्यांनी त्यांच्या रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती दररोज संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असतानाही अनेक रक्तपेढ्यांकडून माहिती वेळेवर अद्ययावत न केल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक रक्त शोधण्यासाठी विविध रक्तपेढ्यांमध्ये धावपळ करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मालेगांव ( जि.नाशिक) शहरातील मालेगाव रक्तपेढी, सेवा रक्तपेढी, अन्सार रक्तपेढी, आणि सामान्य

रुग्णालयातील रक्तपेढी तसेच मुंबईतील शासकीय रक्तपेढी व सर जे जे, सेंट जॉर्ज, केईएम, सायन, नायर, राजावाडी रुग्णालयातील रक्तपेढ्यांणमध्ये रक्ताचा साठा अपुरा पडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय रक्तपेढीमध्ये रक्त उपलब्ध नसल्यामुळे थॅलेसेमिया रुग्ण, मोठ्या शस्त्रक्रिया आणि आपत्कालीन उपचारावर याचा परीणाम होत असून रुग्णांच्या नातेवाईकांना स्वखर्चाने खाजगी रक्तपेढ्यांकडे धाव घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील सर्व रक्तपेढ्यांमध्ये रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध होण्यासाठी रक्तदान शिबिरे वाढविणे, रक्तसाठा व्यवस्थापन सुधारणा करणे, रक्तसाठ्याची रिअल-टाईम माहिती व उपलब्धता सुलभ करण्यासाठी एकात्मिक ऑनलाइन प्रणाली प्रभावीपणे राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रक्तपेढ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

रक्तसाठ्याची अद्ययावत माहिती दररोज संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे बंधनकारक असतानाही काही रक्तकेंद्रांकडून माहिती वेळेवर अद्ययावत करण्यात येत नाही.

तथापि, रक्तकेंद्रांकडून माहिती वेळेवर अद्ययावत न केल्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आवश्यक रक्त शोधण्यासाठी रक्तकेंद्रांमध्ये धावपळ करावी लागल्याची कोणतीही तक्रार राज्य रक्त संक्रमण परिषदेस प्राप्त नाही.

(२) हे खरे नाही.

माहे जानेवारी ते मे, २०२६ या कालावधी मध्ये मुंबई जिल्हा व नाशिक जिल्ह्यातील नमूद रक्तकेंद्रामध्ये एकूण २५३३४ युनिट एवढा रक्तसाठा उपलब्ध होता व त्यापैकी एकूण २४४४६ युनिट रक्ताचा वापर दिसून येतो.
(३) हे खरे नाही.

केंद्र शासनाचे पत्र क्र. S१२०१६/०१/२०१२-NACO(NBTC) दि. १२/०२/२०१४ व महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या परिपत्रक क्र. राररसे-२०१३/प्र.क्र.२२४/आ-५ दि. १८/०६/२०१४ नुसार थॅलेसेमिया रुग्णांना सर्व शासकीय व अशासकीय रक्तकेंद्रांनी रक्त मोफत देणे बंधनकारक आहे.
(४) केंद्र शासनाच्या ई-रक्तकोष संकेतस्थळावर व राज्य रक्त संक्रमण परिषदेच्या www.mahasbtc.org या संकेतस्थळावर रिअल-टाईम माहिती भरता येते आणि ती (https://eraktkosh.mohfw.gov.in) तसेच www.mahasbtc.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. यात माहिती वेळेवर भरण्यासाठी सर्व रक्तकेंद्राचा नियमितपणे पाठपुरावर करण्यात येतो. तसेच त्याचे उल्लंघन करणाऱ्या रक्तकेंद्रांवर शासन निर्णय क्रमांक राररसे-२०२०/प्र.क्र.४९८/आ-५ दि. ०२/१२/२०२० नुसार प्रती दिन रु. १०००/- या प्रमाणे दंड आकारण्यात येतो. सन २०२५-२६ मध्ये रु. (३२,६७,०००/- रु. बत्तीस लाख सदुसष्ठ हजार फक्त) दंड आकारण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बिडी कामगारांना किमान वेतन मिळणेबाबत

**(९) * ३९३४७ श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कामगारांना किमान वेतन देणे कायद्याने बंधनकारक असतानाही बीडी कामगारांना त्यापेक्षाही कमी वेतनात काम करावे लागत असल्याची गंभीर बाब माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बिडी कामगारांना किमान वेतन देण्याचे शासकीय आदेशाचे उल्लंघन करुन बिडी मालक संघटनेने कामगारांना किमान वेतन देण्यास असमर्थता दर्शवली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, बिडी कामगारांना किमान वेतनाप्रमाणे वेतन न दिल्यास राज्य बिडी कामगार संघाने बिडी मालक यांच्या विरोधात दिनांक २ जून, २०२६ रोजी मोर्चा काढण्याची नोटीस शासनास दिली आहे तसेच त्यांच्यावर कारवाई करण्याची मागणी राज्य बिडी कामगार संघाने मा.कामगार मंत्री यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने राज्यातील बिडी कामगारांना किमान वेतन तसेच त्यांना न्याय मिळवून देण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र राज्य बिडी कामगार संघ, पुणे यांच्या दि. २५/०/२०२६ रोजीच्या पत्रामध्ये बिडी कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत दि. १६/०४/२०२६ रोजी मंत्रालय, मुंबई येथे बिडी कामगारांचा मोर्चा काढण्याची बाब नमूद केली आहे.
(४) किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत बिडी कामगारांसाठी जाहीर केलेल्या किमान वेतनाची त्वरित अंमलबजावणी करणेबाबत शासन स्तरावर मालक प्रतिनिधी, कामगार प्रतिनिधी व शासन प्रतिनिधी यांचेसमवेत वेळोवेळी बैठका पार पडल्या असून, मालक प्रतिनिधी व कामगार प्रतिनिधी यांचेकडून प्राप्त निवेदनांवर पुढील कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात रक्तसाठ्याचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(१०) * ३७५७३ श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उन्हाच्या कडाक्यामुळे रक्तदान शिबिरांचे आयोजन कमी झाल्याने घाटी शासकीय रुग्णालयासह शहरातील रक्तपेढ्यांमध्ये रक्ताचा तुटवडा निर्माण झाल्याचे दिनांक ०३ एप्रिल, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रक्तटंचाईमुळे अपघातग्रस्त रुग्ण, शस्त्रक्रिया करण्याचे रुग्ण, थॅलेसेमिया तसेच गंभीर आजारांनी बाधित रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध न झाल्याने त्यांच्या उपचारांवर परिणाम होत असून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना धावपळ तसेच आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, घाटी रुग्णालय व इतर रक्तपेढ्यांमध्ये पुरेसा रक्तसाठा नसल्याने रुग्णांना आवश्यक रक्त मिळविण्यासाठी रक्तदान करण्याची अट घालण्यात येते तसेच रक्तसंकलन शिबिरे नियमित न झाल्याने रक्तपुरवठा साखळी विस्कळीत झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार जिल्ह्यात रक्तसाठा नियमित ठेवण्यासाठी रक्तदान शिबिरांचे नियोजन, आपत्कालीन रक्तसाठा व्यवस्था मजबूत करणे तसेच रुग्णांना तातडीने रक्त उपलब्ध होण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) नाही.

दिनांक ०३ एप्रिल, २०२६ रोजी रक्तकेंद्र, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, छत्रपती संभाजीनगर येथे मुबलक रक्तसाठा उपलब्ध होता. त्यामध्ये Packed Red Cells (PRC)-१६१, Fresh Frozen Plasma (FFP)-५६७, Platelets-२५ व Whole Blood-७ युनिट्सचा समावेश होता. रक्तकेंद्रात पुरेसा रक्तसाठा उपलब्ध असल्यामुळे दिनांक ०३/०४/२०२६ रोजी विविध गरजू रुग्णांना ६६ रक्त व रक्तघटकांचा पुरवठा करण्यात आला.

(२), (३) व (४) थॅलेसेमिया तसेच गंभीर आजारांनी बाधित रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध करून देण्यात आले. शस्त्रक्रियेदरम्यान रक्ताची आवश्यकता भासलेल्या रुग्णांनाही वेळेवर रक्तपुरवठा करण्यात आला असून रक्ताअभावी कोणतीही शस्त्रक्रिया पुढे ढकलण्यात आलेली नाही. तसेच, रक्ताअभावी रुग्णांच्या उपचारांवर परिणाम झाल्याबाबत अथवा रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

तसेच, दिनांक ०३.०४.२०२६ रोजी ०९ स्वैच्छिक रक्तदात्यांनी रक्तदान केले. संस्थेमध्ये रक्तसाठा मुबलक ठेवण्यासाठी विविध स्वयंसेवी संस्थांशी समन्वय साधून रक्तदानासाठी जनजागृती व समुपदेशन करण्यात येत असून विविध ठिकाणी नियमित रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

### राज्यात कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना

**(११) *३३३८२ श्री.राजेश बकाने (देवळी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कर्करोगाच्या प्रामाणात वाढ होत असून महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण सर्वाधिक असून गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे रुग्ण मोठ्या प्रमाणावर निदर्शनास येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वर्धा जिल्ह्यात मागील काही वर्षांच्या तुलनेत कर्करोगाच्या रुग्णसंख्येत वाढ झाली असून विशेषतः मुख कर्करोगाच्या रुग्णसंख्येत अंदाजित संख्येपेक्षा सुमारे सहापट वाढ झाली असून जिल्ह्यात मुख कर्करोगाचे अंदाजित १२७ रुग्णांच्या तुलनेत ७३२, स्तन कर्करोगाचे अंदाजित १९९ च्या तुलनेत ४४६ व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे अंदाजित १२३ च्या तुलनेत २२३ प्रत्यक्ष रुग्ण आढळल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्ह्यातील ८० टक्क्यांहून अधिक मुख कर्करोगाच्या रुग्णांचा संबंध तंबाखू सेवनाशी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, वाढत्या कर्करोगाच्या पार्श्वभूमीवर प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालये व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे कर्करोग तपासणी, निदान व उपचारासाठी आवश्यक मनुष्यबळ, उपकरणे, तंबाखूमुक्ती मोहीम, तज्ञ डॉक्टर उपलब्ध करणे तसेच स्तन व गर्भाशय मुखाच्या कर्करोगाच्या वेळेवर निदानासाठी जिल्हास्तरावर विशेष तपासणी शिबिरे, जनजागृती मोहीम व घराघरांत आरोग्य तपासणी उपक्रम राबविणे, महिलांची मोफत तपासणी, तसेच एचपीव्ही लसीकरण मोहिमेची अंमलबजावणी करणे याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) हे खरे आहे.

वर्धा जिल्हयात वय वर्ष ३० पेक्षा अधिक स्त्री व पुरुष लोकसंख्येनुसार मुख कर्करोगाचे अंदाजित १२४ च्या

तुलनेत ७७० रुग्ण नोंद असून सहापट वाढ झाली आहे. वय वर्ष ३० पेक्षा अधिक असलेल्या स्त्रीयांमध्ये स्तन कर्करोगाचे अंदाजित १९५ च्या तुलनेत ५४८ रुग्ण, गर्भाशय मुखाच्या कर्करोगाचे अंदाजित ११९ च्या तुलनेत २२८ रुग्ण आहे.

(३) हे खरे आहे.

वर्धा जिल्हयामध्ये तंबाखू सेवनाचे प्रमाण जास्त असून ७५ ते ८० टक्के मुख कर्करोगाच्या रुग्णांचा संबंध तंबाखू सेवनाशी असल्याचे निदर्शनास आले आहे.

(४) व (५) कर्करोग रुग्णांचा शोध घेण्यासाठी शासनामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत ज्यामध्ये (१) स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान, (२) दोन कोटी महिला आरोग्य तपासणी व कर्करोग जनजागृती (३) कर्करोग तपासणी व्हॅन (४) तसेच राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रमांतर्गत COTPA -२००३, FGD तंबाखू मुक्त शाळा व कार्यालय २००३ अभियान, दंडात्मक कार्यवाही, थुंकी प्रतिबंध निर्देश फलक, इत्यादी (५) समुदाय स्तरावर आशा, एएनएम, एमपीडब्लू व सीएचओ मार्फत Population Based Screening तसेच Opportunistic Screening केले जाते.

कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा सामान्य रुग्णालय येथे कर्करोग तपासणी, निदान व उपचारासाठी स्क्रिनींग करण्यात येते व संशयित रुग्णांना जिल्हा स्तरावर संदर्भीत केले जाते. तसेच ग्रामीण / उपजिल्हा/जिल्हा रुग्णालय स्तरावर एनसीडी क्लिनीकची स्थापना केलेली आहे. त्या ठिकाणी १ वैद्यकीय अधिकारी, १ अधिपरीचारीका, १ समुपदेशक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

संशयित कर्करोग रुग्णांना निदान व उपचाराकरिता Tertiary Cancer Care Center १) समिर गुप्ता मेमोरियल कॅन्सर हॉस्पीटल, सावंगी मेघे, वर्धा २) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कॅन्सर हॉस्पीटल, नागपूर, ३) नॅशनल कॅन्सर इन्स्टीट्यूट, नागपूर ४) एमजीआयएमएस सेवाग्राम, वर्धा या ठिकाणी संदर्भीत केले जाते. पी.एम.जे.ए.वाय. व मुख्यमंत्री सहायता निधी मार्फत रुग्णांचे मोफत निदान व उपचार केले जातात.

तसेच, जिल्हा सामान्य रुग्णालय वर्धा येथे डे केअर कॅन्सर सेंटर कार्यान्वित करण्यात येत असून दिनांक ४ फेब्रुवारी, २०२५ पासून विशेष कर्करोग मोहिम वर्धा जिल्ह्यात राबविण्यात येत आहेत.

एचपीव्ही लसीकरण मोहिमे अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व जिल्हा रुग्णालय येथे १४ ते १५ वयोगटाच्या मुलींना एचपीव्ही लस देण्यात येत आहे. जिल्ह्यात आजपर्यंत २०८४ मुलींना एचपीव्ही लस देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सुपारी, काजू बोंड, ताड तसेच मोह वृक्षांच्या उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणेबाबत

**(१२) * ३७७४५ श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुपारी, काजू बोंड, ताड तसेच मोह वृक्षांच्या उत्पादनांवर आधारित प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या या वृक्षांच्या उत्पादनांसाठी सर्वसमावेशक व एकात्मिक शाश्वत उद्योग विकास धोरण अस्तित्वात नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर उत्पादनांच्या संकलन, प्रक्रिया, मूल्यवर्धन, विपणन व निर्यात यांचा समावेश असलेला कृती आराखडा तयार करण्याबाबतचा प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(४) तसेच, चालू अर्थसंकल्पीय वर्षात किंवा आगामी अर्थसंकल्पीय वर्षासाठी यासंदर्भात किती रकमेची स्वतंत्र

अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार सुपारी, काजू बोंड, ताड व मोह उत्पादनांवर आधारित शाश्वत उद्योग उभारण्यासाठी समन्वित धोरण तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) काजू बोंड प्रक्रिया, ताड प्रक्रिया आणि मोह या उद्योगांसाठी प्रोत्साहन देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

तथापि, दि.०२/१२/२०२० च्या शासन निर्णयान्वये काजू प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन योजनेतंर्गत राज्यातील काजू प्रक्रिया उद्योग घटकांनी राज्यामध्ये उत्पादित व प्रक्रिया केलेल्या काजूपैकी महाराष्ट्र राज्यामध्ये अंतिमतः विक्री झालेल्या काजूच्या विक्रीवर देय असलेला वस्तू व सेवा कर भरल्यानंतर त्यापैकी १०० टक्के ढोबळ राज्य वस्तू व सेवा कर प्रोत्साहन अनुदान देण्यात येते. सदर कर सवलत ही दि.०१/०४/२०२० पासून अनुज्ञेय करण्यात आलेली आहे.

राज्यातील इच्छुक युवक/युवतींना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणारी राज्याची महत्वाकांक्षी योजना असून दि. ०१/०८/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) या योजनेची घोषणा करण्यात आली.

सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांचे (MSMEs) देशाच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण योगदान आहे. MSME क्षेत्राचे महत्व विचारात घेऊन केंद्र तसेच राज्य शासनाने सदर क्षेत्रास चालना देण्यासाठी सामुहिक विकास संकल्पनेवर आधारित महाराष्ट्र शासनाने राज्याची औद्योगिक समूह विकास योजना (महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजना) जाहिर करुन त्याअंतर्गत विशेषत: औद्योगिकदृष्ट्या अविकसित भागावर लक्ष केंद्रित करुन योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. औद्योगिक समूह योजनांतून सूक्ष्म व लघु उपक्रमाच्या सर्वांगीण विकास व वाढीकरीता क्षमतावृध्दी कार्यक्रम तसेच उच्च दर्जाच्या तंत्रज्ञानाने युक्त सामायिक सुविधा केंद्र उपलब्ध करुन देण्यात येतात. सामायिक सुविधा केंद्रांतर्गत संशोधन व विकास, पॅकेजिंग केंद्र, चाचणी सुविधा, प्रशिक्षण केंद्र, सामाईक जलनि:स्सारण, सामाईक प्रक्रिया केंद्र इ. समावेश होतो.

फळे, फुले व मध यापासून उत्पादित होणाऱ्या सर्व वाईनचा समावेश करुन एकात्मिक धोरण अंमलात आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.
(२) हे खरे आहे. फळे, फुले व मध यापासून उत्पादित होणाऱ्या सर्व वाईनचा समावेश करुन एकात्मिक धोरण अंमलात आणण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचारधीन आहे.
(३) सद्य:स्थितीत याविषयीचा कोणताही प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला नाही.

राज्यात शेत पिकांचे मुल्यवर्धन करण्यासाठी व शेतकऱ्यांना जास्तीचे उत्पन्न मिळून देण्यासाठी राज्यात अन्न प्रक्रियेस चालना देण्यात येत आहे. यासाठी कृषी विभागामार्फत मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना सन २०१७ पासून व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग (PMFME) योजना सन २०२०-२१ पासून या योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांतर्गत सुपारी, काजू बोंड,ताड तसेच मोह फळांवर प्रक्रिया करुन अन्न पदार्थ निर्मिती करण्यासाठी प्रकल्पांना देखील अनुदान देय आहे.

राज्याला अन्नप्रक्रिया उद्योगाला चालना देणे, शेतीमालाचे मूल्यवर्धन करण्याकरीता शेतकऱ्यांचे सहभागाद्वारे आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित प्रकल्प स्थापित करण्यास प्रोत्साहन देणे, उत्पादित अन्न पदार्थाच्या गुणवत्तेमध्ये वाढ व्हावी, ऊर्जेची बचत व्हावी यासाठीच्या प्रकल्पाच्या आधुनिकीकरणास प्रोत्साहन देण्याच्या उद्दिष्टासह मुख्यमंत्री कृषि अन्नप्रक्रिया योजना ही १०० टक्के राज्य पुरस्कृत योजना देखील कृषि विभामार्फत सुरु करण्यात आलेली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अभाणपाडा (ता.वाडा,जि.पालघर) येथील एका कंपनीत वातानुकुलीत यंत्रणेचा स्फोट होवून कामगारांचा झालेला मृत्यू

**(१३) * ३९५२९ श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार (कळवण) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अभाणपाडा (ता.वाडा,जि.पालघर) येथील एका कंपनीत वातानुकुलीत यंत्रणेच्या दुरुस्ती कामात स्फोट होवून तीन कामगारांचा मृत्यू झाल्याची घटना माहे मार्च,२०२६ मध्ये घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कामगार सुरक्षा कायदा, १९४८ मधील कामगार सुरक्षाविषयक तरतुदींचे उल्लंघन झाल्यानेच सदर कामगारांचा मृत्यू झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कामगारांना कामगार अपघात विमा अंतर्गत नुकसान भरपाई देखील देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने यामध्ये दोषी असणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासह मृत कामगारांच्या कुटुंबियांना कामगार अपघात विमा अंतर्गत नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) सदर घटनेत एअर कंडिशनरच्या दुरुस्तीचे काम सुरू असताना त्यातील अंतर्गत दाब मोकळा न करता कॉम्प्रेसर सुरू केल्यामुळे त्यात अतिदाब निर्माण होउन कॉम्प्रेसर बॉडीचा स्फोट झाला. सदर घटनेत एकूण ३ कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाला.
(३) सदर घटनेतील मृतांच्या वारसांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत नुसार नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.
(४) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून सदर कारखान्याच्या भोगवटादाराविरुध्द महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ च्या नियम ११५ (१) व नियम ११५(२) नुसार तसेच व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० चे कलम ६ (२) (अ) अंतर्गत भंग आढळून आल्याने प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई येथे खटला दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेमध्ये कंत्राटदाराविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १०६(१) अन्वये वाडा पोलीस ठाणे येथे दाखल केला आहे.

सदर अपघातामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना नुकसान भरपाई आयुक्त, ठाणे यांना कळविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये वैद्यकीय पदव्युत्तर वाढीव जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू करणेबाबत

**(१४) * ३३४९५ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये पदव्युत्तर (PG) जागा १,२७० ने वाढवण्यासाठी रु.३३

कोटींहून अधिक इतक्या शुल्कास शासनाने मान्यता दिली असून ३४ महाविद्यालयांमधून ९७० हून अधिक जागांसाठी प्रस्ताव सादर झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन जागांच्या निर्मितीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा उभारताना निधीची कमतरता भासत असल्याने सुमारे रु.१९.५६ कोटी इतका निधी इतर खात्यांतून तात्पुरता वर्ग (Internal Adjustment) करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या (NMC) मार्गदर्शक सूचनेनुसार दिनांक २ ते ३१ मार्च, २०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबवण्यात आली असताना, अजूनही महाविद्यालयांना 'आवश्यकता प्रमाणपत्र' किंवा 'संमती' मिळणे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नागपूर (IGGMC), गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली यांसारख्या मागास भागातील वैद्यकीय महाविद्यालयांमधील तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या वाढविण्यासाठी या जागा वाढीच्या प्रक्रियेला गती देण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शैक्षणिक सन २०२६-२७ पासूनच या वाढीव जागांवर प्रत्यक्ष प्रवेश प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने प्रशासकीय पातळीवर येणाऱ्या अडचणी दूर करणेसह वैद्यकीय महाविद्यालयांमधील तज्ज्ञ डॉक्टरांची संख्या वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाचे कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) व (२) राज्य शासनाने ३४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांकरिता १६२१ पदव्युत्तर पदवी जागांकरिता आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित केलेले होते. त्यापैकी १४८९ जागांकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांना संबधित अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय यांचेमार्फत अर्ज सादर करण्यात आलेले आहेत.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगास याकरीता आवश्यक ते शुल्क भरण्याकरीता या महाविद्यालयांना त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या स्वियप्रपंची खात्यातून शुल्क अदा करण्याबाबत तसेच सदर स्वियप्रपंची खात्यामध्ये पुरेशी रक्कम नसल्यास इतर महाविद्यालयांच्या स्वियप्रपंची खात्यामधून एक विशेष बाब म्हणून निव्वळ उसनवारी तत्वावर एकूण १२७२ जागांकरिता ३३,११,४८,००० रुपये एवढ्या रकमेचे शुल्क उपलब्ध करुन देण्याबाबत संचालनालय स्तरावरुन दि.२४/०३/२०२६ रोजी आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

(३) नाही, हे खरे नाही.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक २७/०२/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सन २०२६-२७ करिता नवीन वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करणे व प्रवेश क्षमतेत वाढ करण्यासाठी ऑनलाईन पोर्टलद्वारे दिनांक ०२/०३/२०२६ ते ३१/०३/२०२६ असा कालावधी निश्चित करण्यात आला होता. तद्नंतर राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांनी दिनांक २६/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये अर्ज करण्याकरिता दिनांक २०/०४/२०२६ रोजीपर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती. संबंधित अधिष्ठातांमार्फत प्राप्त आवश्यकता प्रमाणपत्राच्या अनुषंगाने, शासनाने आवश्यकता प्रमाणपत्र निर्गमित केलेले आहेत. त्यानुसारच, महाविद्यालयांमार्फत राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आलेले आहेत.

(४) ३४ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमार्फत १४८९ जागांकरिता राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोग, नवी दिल्ली यांना अर्ज सादर करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये नागपूर (IGGMC), गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोली यांसारख्या मागास भागातील वैद्यकीय महाविद्यालयांचा देखील समावेश आहे.

(५) पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या जागा वाढविण्याच्या अनुषंगाने राज्यातील शासकीय वैद्यकीय

महाविद्यालयांतील अध्यापकाची मंजूर असलेली नियमित पदे प्राधान्याने भरण्याची कार्यवाही सुरु असून नियमित पदे भरेपर्यंत करार तत्वावर पदे भरण्यात येतात. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात व्हीजीटींग फॅकल्टी द्वारे अध्यापकांची नियुक्ती संस्था स्तरावर करण्यात येते.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे करकंब (ता. पंढरपूर, जि. सोलापूर) येथे पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्याच्या कामात झालेली अनियमितता

**(१५)** * **३८६०९ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे करकंब (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे पाझर तलावाचे रुपांतर साठवण तलावात करण्याचे काम महाराष्ट्र राज्य जलसंधारण महामंडळ, छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत करण्यात येत असून सदर कामातील पाझर तलाव क्र.५ व ६ च्या कामामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार झालेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पाझर तलाव हा जिल्हा परिषद, सोलापूर यांच्या मालकीचा असून त्यांची रीतसर कायदेशीर परवानगी घेणे आवश्यक असतांनाही परवानगी न घेता सदरच्या कामासाठी ग्राऊटिंग पायातील चरामध्ये २०० ते ३०० फूट खोलीचे बोरवेल घेण्याची कामे केली नसतानाही ही काम केल्याचे दाखवून रु. १ कोटी ८८ लाख आणि रु.२ कोटी ४६ लाख इतक्या रकमेचा रुपये अनुक्रमे ५ व ६ या कामासाठी वाढीव दायित्वाचा बेकायदेशीरपणे प्रस्ताव पाठविण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, सदर पाझर तलावाची कामे सुरु असतांनाच कामाची देयके उचलण्यात आली असून याप्रकरणी चौकशी करण्याच्या मागणीसाठी जनशक्ती शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह हजारो शेतकऱ्यांनी मुख्य अभियंता, जलसंधारण कार्यालय, पुणे येथे आंदोलन केले होते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, अप्पर आयुक्त, जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे-६ यांनी प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, पुणे यांना तात्काळ कार्यवाही करुन अहवाल सादर करण्याचे आदेश देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय, त्याअनुषंगाने याप्रकरणी संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड :** (१) महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ यांच्यामार्फत झालेल्या कामांची चौकशी करण्याकरीता शासन आदेश दि.०५/०३/२०२६ अन्वये विशेष चौकशी पथक (एसआयटी) गठीत करण्यात आले आहे. पाझर तलावाचे रूपांतरीत साठवण तलाव या प्रकारच्या सर्व कामांचा एसआयटीच्या कार्यकक्षेत समावेश करण्यात आला असून मौजे करकंब (ता.पंढरपूर, जि. सोलापूर) येथील पाझर तलाव क्र. ५ व ६ चे रुपांतर साठवण तलावात करण्याबाबतच्या कामाची एसआयटी मार्फत चौकशी करण्यात येत असून चौकशी अहवालानुसार दोषी आढळल्यास जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल.
(२) हे खरे नाही.

पाझर तलाव करकंब क्र. ५ व ६ या दोन्ही योजना जिल्हा परिषदेच्या दि. ०५.०३.२०२४ पत्रान्वये विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे परवानगीबाबत कोणताही भंग झालेला नाही.

प्रस्तुत कामाची एसआयटीमार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) हे खरे नाही.

अप्पर आयुक्त तथा मुख्य अभियंता, पुणे यांनी त्यांच्या दिनांक ३०/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये चौकशीसाठी प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण अधिकारी, पुणे यांची नियुक्ती केली असून त्यांनी दि.०२/०९/२०२५ रोजी स्थळ भेटीसाठी येऊन तपासणी केली व आवश्यक कागदपत्रे मागविण्यात आली. विभागामार्फत सर्व कागदपत्रांची पूर्तता करण्यात आली असून पुढील कार्यवाही प्रादेशिक दक्षता व गुणनियंत्रण पथक, पुणे यांचेमार्फत करण्यात येत असून अद्याप अहवाल प्राप्त झालेला नाही.तसेच प्रस्तुत कामाची एसआयटीमार्फत देखील चौकशी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सरकारी रक्तपेढयांमधील रक्त पिशव्या वाया गेल्याबाबत

**(१६) * ३९३८५ श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ७७ सरकारी रक्तपेढयांमध्ये तब्बल १५ हजारांहून अधिक रक्तपिशव्या वाया गेल्याचे माहे एप्रिल, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रक्त पिशव्या वाया जाण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार यांस जबाबदार असणाऱ्या संबधितावर कारवाई करणेसह भविष्यात असे प्रकार घडू नये याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे खरे आहे.

राज्यात ७७ शासकीय रक्तकेंद्रामार्फत सन २०२५ या वर्षात एकूण रक्त संकलन ३,९३,००० युनिट एवढे झाले व त्यापैकी १५,५२१ युनिट रक्त नष्ट (discard) करण्यात आले. तथापी, त्यापैकी ९०७८ युनीट हे दूषित रक्त तसेच वापरण्यायोग्य नसल्यामुळे वाया गेले व ६४४३ युनीट एवढे रक्त मुदतबाहय या कारणामुळे वाया गेलेले आहे. कालबाह्य कारणास्तव रक्त वाया जाण्याचे प्रमाण हे १.६३ टक्के असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक मानंकानुसर (४ टक्के) पेक्षा कमी आहे.

(२) रक्त वाया जाण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | रक्तातील रक्त संक्रमण आजारामुळे (TTD) | ४०४८ |
| २. | कालबाहयतेमुळे (ExPiry) | ६१७८ |
| ३. | रक्तपिशवी खराब असल्याने गळती (Leakage) | ४९९ |
| ४. | रक्त पिशवी कमी प्रमाणात भरल्यामुळे (Less quantity) | ४०४७ |
| ५. | रक्त गोठल्यामुळे / रक्ताच्या गुठळया झाल्यामुळे (Clotting/Hemolysation) | ४१५ |
| ६. | रक्ताचा रंग बदलल्यामुळे (Discoloration) | ७८ |
| ७. | इतर तांत्रिक कारणे. जसे की, Lipaemic, lcteric, Condemnation | २५६ |
| | एकूण | १५,५२१ |

(३) रक्ताची सर्वसाधारण आयुर्मर्यादा ३५ दिवसांची असते. त्यामुळे ठराविक काळापर्यंतच रक्त साठवता येते. तथापि, रक्तकेंद्रांना रक्ताची तंतोतंत गरज/मागणी याचा अंदाज बांधता येत नाही. तसेच कुठलीही आपत्ती/आणिबाणी जसे की, मोठा अपघात, नैसर्गिक/मानव निर्मित आपत्तीच्या प्रसंगी रुग्णांचे प्राण वाचविण्याच्या

दृष्टीने सर्व रक्तगटाचे रक्त प्रत्येक वेळी उपलब्ध ठेवणे रक्तकेंद्राला गरजेचे असते. प्रसंगी रक्ताअभावी गरजू रुग्णाचे प्राण जाऊ नये यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांप्रमाणे उपाययोजना अवलंबिल्या जातात.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भद्रावती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील बरांज कोल माईन्स लि. येथे कार्यरत असलेल्या कामगारांच्या प्रलंबित मागण्यांबाबत**

**(१७) * ३५०३३ श्री.करण देवतळे (वरोरा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भद्रावती (जि. चंद्रपूर) तालुक्यातील बरांज कोल माईन्स लि. (कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (KPCL) येथे कार्यरत असलेल्या शेकडो खाण कामगारांना अनेक वर्षांपासून विविध आर्थिक व सेवा विषयक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित कामगारांना एच.पी.सी. (High Power Committee) नुसार देय असलेले वेतन अद्याप लागू करण्यात आले नसल्यामुळे कामगारांमध्ये तीव्र नाराजी आहे व त्यांच्या आर्थिक परिस्थितीवर गंभीर परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर कंपनीमार्फत नोकरी देण्याच्या बदल्यात कामगारांच्या वेतनातून सुमारे रु.५ लाख रुपयांपर्यंत कपात केल्याची गंभीर बाब निदर्शनास आली तसेच सदर कपात ही बेकायदेशीर असून कामगारांच्या आर्थिक शोषणाचा प्रकार असल्याचा आरोप करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१५ ते २०२० या कालावधीतील तब्बल ३८ महिन्यांचे थकीत वेतन आजतागायत कामगारांना देण्यात आलेले नाही तसेच, सन २०२० ते २०२५ या कालावधीतील कामगारांच्या भविष्य निर्वाह निधी (PF) संदर्भातील संपूर्ण स्टेटमेंट जाहीर करण्यात न आल्याने संबंधित रक्कम नियमित जमा करण्यात आली आहे किंवा नाही याबाबत कामगारांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) तसेच, ग्रॅज्युइटीची रक्कम केंद्र शासनाच्या प्रचलित नियम व धोरणानुसार न दिल्याने कामगारांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, याप्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कामगारांच्या सर्व प्रलंबित मागण्या तातडीने निकाली काढण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
बंराज कोल माईन्स लि. (कर्नाटक पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड (KPCL) जि.चंद्रपूर ही खाण अस्थापना राज्य शासनाच्या अखत्यारित येत नसून केंद्र शासनाच्या अखत्यारितील बाब आहे.
त्यासंदर्भात समेट कार्यवाहीत सहायक कामगार आयुक्त (केंद्रिय), चंद्रपूर यांना BCMPL (KPCL) च्या व्यवस्थापनाने एच.पी.सी (Hight Power Committee) नुसार वेतन दर त्यांच्या कंपनीस लागू व बंधनकारक नसल्याचे कळविलेले आहे.
(३) हे खरे नाही.
याबाबत सहायक कामगार आयुक्त (केंद्रिय), चंद्रपूर यांना कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.
(४) सहायक कामगार आयुक्त (केंद्रिय), चंद्रपूर यांना समेट प्रक्रियेदरम्यान BCMPL (KPCL) च्या व्यवस्थापनाने दिलेल्या माहितीनुसार प्रकल्पबाधित व्यक्तींना (PAPs) ३० महिन्यांच्या वेतनाइतकी रक्कम एक्सग्रेशिया म्हणून देण्यात आली होती.

मे. बरांज कोल माईन्स, भद्रावती, जि. चंद्रपूर, हा कर्नाटका पॉवर कार्पोरेशन लिमिटेड (KPCL) चा एक उपक्रम आहे. सदरची अस्थापना कर्मचारी भविष्य निधी आणि संकीर्ण तरतूदी अधिनियम, १९५२ अंतर्गत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संगठनच्या (EPFO) च्या कक्षेत येत नाही. सदर आस्थापना कोळसा खाण भविष्य निर्वाह निधी Coal Mines Provident Fund (CMPF) योजने अंतर्गत येते.

(५) हे खरे नाही.

उपदानाची रक्कम न मिळल्याबाबतचा कोणताही दावा (Claim) सहायक कामगार आयुक्त (केंद्रिय) चंद्रपूर यांना प्राप्त झालेला नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड खाण प्रकल्पातून लोहखनिज उत्खननामुळे निर्माण होणाऱ्या समस्या

**(१८)** * **३६०७६ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड खाण प्रकल्पातून (लॉयड्स मेटल्स अँड एनर्जी प्रा. लि.) इंदिरा गांधी चौक येथे सुरजागड येथून लोहखनिज वाहून नेणाऱ्या ट्रकच्या धडकेमुळे श्री.गणेश चौधरी (वय २८, रा. मुल, जि. चंद्रपूर) या तरुणाचा दिनांक २५ मे, २०२५ रोजी जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली आहे, तसेच सुरजागड खाण प्रकल्पाच्या जड वाहतुकीमुळे जिल्ह्यात वारंवार अपघात घडत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरजागड खाण प्रकल्पातून कच्च्या लोहखनिजाची प्रक्रिया न करता थेट जिल्हाबाहेर वाहतूक केली जात असल्याने रस्त्यांची मोठ्या प्रमाणावर हानी होऊन अपघातांचे प्रमाण वाढत आहे तसेच सदर प्रकल्पामध्ये वाहतूक व्यवस्थापन व सुरक्षा नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना, ट्रॅफिक नियंत्रण, वाहनांची गती मर्यादा व अपघात प्रतिबंधक यंत्रणा प्रभावीपणे कार्यरत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकल्पामुळे स्थानिक सुशिक्षित बेरोजगार युवकांना रोजगार डावलून बाहेरील जिल्ह्यातील व्यक्तींना प्राधान्य दिले जात असल्याने स्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकल्पामुळे परिसरातील शेती क्षेत्रावर लोहयुक्त धुळीचा थर साचून शेती उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन शेतीचे कायमस्वरूपी नुकसान होत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, सदर खाण प्रकल्पामुळे गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते, पर्यावरण, मानवी आरोग्य व वनक्षेत्र यावर गंभीर परिणाम होत असल्याने शासनाकडून स्वतंत्र पर्यावरणीय व सामाजिक परिणाम मूल्यांकन (Impact Assessment) करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सुरजागड खाण प्रकल्पातून लोहखनिज उत्खनन व जड वाहतुकीवर तातडीने निर्बंध घालणे, स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर नियम लागू करणे तसेच वारंवार होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) अपघात झाला आहे, हे खरे आहे.

पोलीस विभागाकडून प्राप्त अहवालानुसार गडचिरोली जिल्हयातील शहरातील इंदिरा गांधी चौक येथे ट्रकच्या धडकेमुळे श्री.गणेश चौधरी (वय २८, रा. मुल जि. चंद्रपूर) या तरुणाचा दिनांक २५/०५/२०२५ रोजी जागीच मृत्यू झाला असल्याची घटना घडली आहे. सदर घटनेमध्ये गडचिरोली पोलीस ठाणे येथे दिनांक २६/०५/२०२५ रोजी गु.र.क्र. ३४६/२०२५ कलम १०६ (१), २८१ भान्यासं, सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पुर्ण करुन दिनांक २८/०७/२०२५ रोजी आरोपी विरुध्द

दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले असून सदरचा गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

परिवहन विभाग, गडचिरोली यांचेकडून प्राप्त अहवालानुसार दि.२५/०५/२०२५ रोजी इंदिरा गांधी चौक, गडचिरोली येथे अपघात झाल्याचे वृत्त दै. लोकमत या वृत्तपत्रात दि. २६/०५/२०२५ रोजी प्रसिध्द आहे. तथापि, प्रथम खबरी अहवाल क्र.०३४६/२०२५ अन्वये अपघातातील वाहन हे सुरजागड मालवाहतुकीबाबत संबधित असल्याचे उल्लेख नाही.

(२) सुरजागड खाण प्रकल्पातून कच्च्या लोहखनिजाची वाहतूक जिल्ह्याबाहेर करण्यात येते ही बाब खरी आहे. वाहतुक व्यवस्थापन, नियंत्रण, वाहनाची गतीमर्यादा याबाबत जिल्हा रस्ता सुरक्षा समिती द्वारे उपाययोजना करण्यात येत आहेत.

(३) हे खरे नाही.

सध्या सुरजागड खाण प्रकल्पात कौशल्याधारित रोजगारास प्राधान्य देण्यात येत आहे. तसेच, स्थानिक उमेदवारांची रोजगारक्षमता आणि तांत्रिक कौशल्य वाढविण्यासाठी त्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण दिले जाते.

(४) होय, हे खरे आहे.

प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने बाधित क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी, सखोल चौकशी व तांत्रिक मूल्यमापन करण्यासाठी कृषी विभागामार्फत जिल्हास्तरावरून एका विशेष समितीचे गठन करण्यात आलेले आहे. सदर समितीद्वारे बाधित क्षेत्रातील माती, पाणी आणि पिकांचे नमुने घेऊन तांत्रिक तपासणी व चौकशीचे काम सुरू आहे. कृषी विभागामार्फत स्थानिक शेतकऱ्यांमध्ये व्यापक जनजागृती मोहीम राबविली जात आहे. बाधित शेती क्षेत्राचा पोत सुधारण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत पोहचविण्यासाठी कृषी विभागामार्फत विशेष कृषी निविष्ठासाठी अनुदान देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

(५) गडचिरोली जिल्ह्यातील जिल्ह्याधिकारी कार्यालयाच्या अधिनस्थ आरोग्य संस्थामध्ये खाण प्रकल्पामुळे नागरिकांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम झाल्याची तक्रार प्राप्त नाही.

सदर उद्योगाची दि.२८/०८/२०२४ रोजी पाहणी करण्यात आली होती. पाहणीदरम्यान खाण परिसरातील पाणी जवळील नाल्याच्या बाजूला डबक्यात साचलेले असल्याचे आढळून आल्याने सदर उद्योगास दि.१४/११/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावित निर्देश देण्यात आले होते.

सदर उद्योगाची दि.१७/०७/२०२५ रोजी पाहणी करण्यात आली व पाहणीदरम्यान संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन आढळल्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडून दि.२५/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली आहे.

(६) दि.०९/०४/२०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात सुरजागड येथील लोहखनिज उत्खनन व जड वाहतुकीवर तातडीने निर्बंध घालणे, स्थानिक नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी कठोर नियम लागू करणे तसेच वारंवार होणाऱ्या अपघातांना आळा घालण्यासाठी जिल्ह्यातील पोलीस विभाग, परिवहन विभाग, वनविभाग प्रदूषण नियंत्रण मंडळ यांची समन्वय बैठक घेण्यात आलेली असून सदर प्रकरणी उपाययोजना करणे, वाहतुकीबाबत वेगमर्यादा निश्चित करणे, नागरीकांमध्ये याबाबत जनजागृती करणे इत्यादी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारबोडी (चिपडी) (ता.कुही, जि.नागपूर) येथील 'कल्पना जिनिंग' या कारखान्यामध्ये लागलेली भीषण आग

**(१९) * ३३८६० श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारबोडी (चिपडी) (ता.कुही, जि.नागपूर) येथील 'कल्पना जिनिंग' या कारखान्यामध्ये लागलेल्या भीषण आगीत कु. रोहन सुरेश दुधवे या चार वर्षीय बालकाचा होरपळून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दिनांक १२ फेब्रुवारी, २०२६ रोजी निदर्शनास आली तसेच कल्पना जिनिंग प्रेसिंगच्या आवारात ट्रॅक्टरच्या इंजिनमधीन शॉर्टसर्किटमुळे शेकडो क्विंटल कापूस जळून खाक झाल्याची घटना दिनांक १६ मार्च, २०२६ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कारखाना हा गेल्या ९ वर्षांपासून विनापरवाना व बेकायदेशीररीत्या सुरु असून कारखान्याच्या छतावरून नियमांचे उल्लंघन करुन धोकादायक हायव्होल्टेज थ्री-फेज विद्यूत वाहिनी गेली असतांना मजुरांच्या निवासी खोल्या व कापूस साठवणूक याकडे सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून एकाच जिनिंगमध्ये महिन्याभरात दोनदा आग लागल्याने येथील कामगारांची कार्यप्रणाली व यंत्र हाताळण्याच्या कार्यपध्दतीवर प्रश्न निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर आगीच्या दुर्घटनेच्या सात दिवसांपूर्वी म्हणजेच दिनांक ५ फेब्रुवारी, २०२६ रोजी जिनिंग व्यवस्थापनाने सदर जमिनीवर एका बँकेकडून रुपये ३५ कोटी इतक्या कर्जाची नोंद ७/१२ उताऱ्यावर केली होती व त्यामुळे रुपये ३५ कोटी इतका विमा हडपण्यासाठी हा अपघात नसून एक सुनियोजित कट असल्याचा संशय स्थानिक नागरिकांकडून व तपास यंत्रणांकडून व्यक्त केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी तहसिलदार, कुही आणि संबंधित पोलीस प्रशासनाने चौकशी केली आहे काय , तसेच बालकाच्या मृत्यूला व कोट्यवधी रुपयांच्या कथित विमा घोटाळ्याला कारणीभूत ठरलेल्या कल्पना जिनिंगच्या मालकांवर व कामगारांच्या सुरक्षिततेकडे दुर्लक्ष करणाऱ्या बेजबाबदार अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) तसेच, आगीत लाखोंचे नुकसान झालेल्या नुकसानग्रस्तांना व मृतांच्या वारसांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) होय, हे खरे आहे.

(२) कारखाना व्यवस्थापनाने सदर कारखान्याची नोंदणी वर्षे २०१८ मध्ये औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाकडे केलेली आहे. सदरहून कारखाना व्यवस्थापनास वर्षे २०१८ ते २०२८ पर्यंत औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयातर्फे कारखाना परवाना दिलेला आहे. यानुसार कामगारांच्या राहण्याकरीता निवासी खोल्या कारखान्याचा नकाश्यामध्ये नसून त्याबाबत व्यवस्थापनास कोणतीही मंजुरी देण्यात आलेली नाही.

(३) भंडारबोडी ता. कुही जि. नागपूर येथे भूमापन क्र. १८,६३, व १७, १९ या क्षेत्रांचे श्री. लक्ष्मीकांत मेघराज तेलमासरे हे मालक आहेत. भूमापन क्र. १८ व ६३ या क्षेत्रांवर कल्पना जिनिंग असून या क्षेत्रांवर कर्ज नसून भूमापन क्र. १७ या क्षेत्रावर एच. डी. एफ. सी. बँकेचा रु. ३५ कोटींचे कर्ज असल्याचे दि. ०५.०२.२०२६ रोजीच्या ७/ १२ नोंदीवरून दिसून येते.

(४) सदर अपघातप्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली असता, कारखान्याच्या भोगवटादाराकडून व्यावसायिक सुरक्षा, आरोग्य व कामाची स्थिती संहिता, २०२० च्या कलम ६(१)(ह) तसेच महाराष्ट्र कारखाने नियम, १९६३ मधील नियम ४ (२) यांचा भंग झाल्याचे आढळून आले असून सदर कायदेभंगाबाबत भोगवटादाराविरुध्द खटला दाखल करण्यात आले आहे.

पोलीस प्रशासनाकडून भारतीय न्याय संहिता, २०२३ च्या कलम १०५ अन्वये कारखाना मालकाविरूध्द गुन्हा दाखल केलेला आहे.

(५) आगीमध्ये मृत झालेल्या मुलाच्या वडिलास रू.तीन लाख आर्थिक मदत व्यवस्थापनाव्दारे देण्यात आलेली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**भाईंदर (पश्चिम) (जि.ठाणे) येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात मुदतबाह्य औषधांचा साठा आढळून आल्याबाबत**

**(२०)** * **३४९२९ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भाईंदर (पश्चिम) (जि.ठाणे) येथील पंडित भीमसेन जोशी शासकीय रुग्णालयात रु.१ कोटी ६५ लाख इतक्या रक्कमेचा मुदतबाह्य औषधांचा साठा आढळून आला असल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतक्या मोठ्या प्रमाणात मुदत बाह्य औषधांचा साठा आढळून आल्याने तेथील आरोग्य व्यवस्थापना संदर्भात प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, या अनुषंगाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) या संस्थेकडून सीएसआर फंडामार्फत पंडित भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर या रुग्णालयास लेखी मागणी नसतांना व किंमतीची पूर्वकल्पना न देता देणगी स्वरुपात रू.१,६४,२४,०००/- एवढ्या रक्कमेची औषधे व उपचारात्मक साहित्य देण्यात आले होते.

सदर औषधे व साहित्यांची पडताळणी केली असता, त्यामध्ये रु.३,५८,४४६/- एवढया रकमेची मुदतबाहय झालेले व रु.४७,३६,४८४/- एवढया रकमेची मुदतबाहय होत असलेले (माहे एप्रिल ते जून २०२६) व रुग्णालयात वापरात न येणारे साहित्य आढळून आले होते.

(२) हे खरे नाही.

पंडीत भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईदर रूग्णालयाने सदर साहित्याचा वापर केलेला नाही. तसेच, प्राप्त साठ्यामध्ये मुदतबाह्य झालेल्या व जवळील मुदतबाह्य दिनांकाचा साठा असल्याचे आढळून आल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक / वैद्यकीय अधिक्षक, पं.भी.जोशी सा.रुग्णालय, मिरा भाईंदर यांनी दिनांक ३०/०३/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सदर साहित्य परत घेण्याबाबत सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) या संस्थेस कळविले होते. त्यानुसार सदर संस्थेने दि.१८/०४/२०२६ व दि.२२/०४/२०२६ रोजी मुदतबाहय व जवळील मुदतबाह्य असलेल्या औषधे व उपचारात्मक साहित्यसाठा परत नेलेला असून सध्या सदर रुग्णालयात कोणतेही मुदतबाहय झाले उपचारात्मक साहित्यसाठा उपलब्ध नाही.

(३) या प्रकरणी उपसंचालक, आरोग्य सेवा, ठाणे यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

सदर प्रकरणात जिल्हा शल्य चिकित्सक/ वैद्यकीय अधिक्षक, पं. भिमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर यांचेमार्फत वरिष्ठ पोलिस निरिक्षक मिरा-भाईंदर पोलिस स्टेशन भाईंदर यांच्याकडे दि.२४/०४/२०२६ व दि.२९/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये सक्षम फाऊंडेशन, भाईंदर (पूर्व) यांच्या विरुध्द एफ.आय.आर. नोंदविण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. त्यानुसार वरिष्ठ पोलिस निरिक्षक मिरा-भाईंदर यांच्यामार्फत चौकशी/

तपासाची कार्यवाही सुरू आहे.

तसेच, अन्न व औषध प्रशासन विभागाचे औषध निरीक्षकांनी दि.२५/४/२०२६ रोजी याबाबत चौकशी केलेली असून सदर औषधी-साहित्यातील नमुने चाचणीसाठी नेलेले आहेत. त्यांचा चाचणी अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील औद्योगिक आस्थापनांमध्ये कामगार कपात करण्याचे अधिकार कारखाना मालकांना दिल्याबाबत

**(२१) * ३२६७४ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील औद्योगिक आस्थापनांमध्ये ३०० पर्यंत कामगार कमी करण्याचे अधिकार कारखाना मालकांना विना परवानगी देण्याचा शासनामार्फत माहे एप्रिल,२०२६ मध्ये निर्णय झाल्याने कामगारांच्या रोजगार सुरक्षिततेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक संबंध नियम, २०२६ आणि महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२६ या नव्या नियमावलींची अंमलबजावणी तत्काळ करण्याचे धोरण आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गिग आणि असंघटीत कामगारांचा समावेश या नव्या नियमावलीत करण्यात आला असून त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कामगार कपात विना परवानगी करण्याच्या तरतुदीमुळे कामगारांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण होत असल्याने त्यावर कार्यवाही करणेबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(५) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने भविष्यात नवीन नियमावलीमुळे औद्योगिक क्षेत्रात पारदर्शकता आणि सुसूत्रता आणण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आकाश फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

केंद्र शासनाने औद्योगिक संबंध विषयक केंद्रीय कायद्यांचे एकत्रीकरण करून त्यामध्ये कालानुरूप बदल करून देशभर समान व्याप्ती असलेली औद्योगिक संबंध संहिता, २०२० तयार केली आहे. सदर संहिता केंद्र शासनाने दिनांक २१/११/२०२५ पासून अंमलात आणली आहे.

औद्योगिक संबंध संहिता, २०२० च्या प्रकरण-१० मध्ये ले-ऑफ, कामगार कपात व औद्योगिक घटक बंद करण्याच्या तरतूदी ३०० हून कमी कामगार नसलेल्या आस्थापनांसाठी लागू करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे आता ३०० हून कमी कामगार नसलेल्या आस्थापनांना ले-ऑफ, कामगार कपात व औद्योगिक घटक बंद करण्याकरीता शासनाची वा सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागते.

(२) होय, हे खरे आहे.

महाराष्ट्र औद्योगिक संबंध नियम, २०२६ आणि महाराष्ट्र वेतन संहिता नियम, २०२६ या नियमांचा प्रारूप मसूदा दि.२८/०४/२०२६ रोजी शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला होता. त्यानुषंगाने सर्व संबंधितांकडून ४५ दिवसांच्या आत हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. सदर हरकती व सूचना सादर करण्याचा कालावधी दि.१२/०६/२०२६ रोजी संपुष्टात आलेला असून प्राप्त हरकती व सूचनांच्या अनुषंगाने नियम अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(३) हे खरे आहे.

केंद्र शासनाने दिनांक २१ नोव्हेंबर, २०२५ पासून अंमलात आणलेल्या सामाजिक सुरक्षा संहिता, २०२० मध्ये गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कर्स यांच्या कल्याणाकरिता केंद्र स्तरावर सामाजिक सुरक्षा मंडळ गठीत करण्याची तरतूद करण्यात आली आहे. या मंडळाद्वारे गिग आणि प्लॅटफॉर्म वर्कर्स यांना विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याची तरतूद करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने, राज्य शासनाने दि.०५/०५/२०२६ रोजी महाराष्ट्र सामाजिक सुरक्षा नियम, २०२६ चा प्रारूप मसूदा शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केला असून त्यावर ४५ दिवसांच्या कालावधीमध्ये संबंधितांकडून हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत.

गिग आणि असंघटित कामगारांचा समावेश पहिल्यांदाच सामाजिक सुरक्षा संहितेमध्ये केलेला आहे. सदर संहितेच्या कलम १०९ नुसार असंघटित कामगारांसाठी विविध योजना तयार करण्याची तरतुद करण्यात आली आहे. असंघटित कामगार, गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी कलम ११२ नुसार हेल्पलाईनची सुविधा करण्याची तरतुद आहे. तसेच कलम ११४ नुसार समोचित शासन गिग आणि प्लॅटफॉर्म कामगारांसाठी (अ) जीवन आणि अपंगत्व विमा, (ब) अपघात विमा, (क) आरोग्य आणि प्रसुतीलाभ, (ड) वृध्दापकाळ संरक्षण, (इ) पाळणाघर, अशा विविध बाबींशी निगडीत योजना तयार करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

(४) पुर्वीच्या औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मधील प्रकरण ५ (बी) मधील तरतूदी १०० हून कमी कामगार नसलेल्या आस्थापनांसाठी लागू होत्या. त्यामुळे १०० हून कमी कामगार नसलेल्या आस्थापनांना ले-ऑफ, कामगार कपात व आस्थापना बंद करण्याकरीता शासनाची वा सक्षम अधिकाऱ्याची परवानगी घ्यावी लागत असे. त्यामुळे औद्योगिक आस्थापनांकडून १०० वा त्यापेक्षा अधिक कामगार कामावर ठेवण्यास निरुत्साह दाखविला जात असे. वाढत्या जागतिकीकरणाच्या युगात अधिकाधिक रोजगार निर्मिती व्हावी, कामगारांना शाश्वत रोजगार मिळून बेरोजगारी कमी व्हावी व उद्योजकांना देखिल मोठ्या प्रमाणात कामगार कामावर ठेवण्याकरीता प्रोत्साहन मिळावे, याकरीता उपरोक्त कामगार संख्या वाढविणे आवश्यक आहे. जेणेकरुन उद्योगास पोषक असे वातावरण निर्माण होऊन मोठ्या प्रमाणात उद्योग आकर्षित होऊन रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. त्यामुळे कामगारांचे हित देखिल सहजगत्या जपले जाईल. त्यामुळे औद्योगिक विकासास चालना मिळेल व मोठया प्रमाणात रोजगार निर्मित्ती होईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर औद्योगिक क्षेत्रात लागणाऱ्या आगींवर नियंत्रण मिळविण्यासाठी अद्ययावत तंत्रज्ञान तयार करणेबाबत

**(२२)** * **३८९४१ श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बोईसर (जि.पालघर) येथील तारापूर औद्योगिक क्षेत्रात अलिकडेच घडलेल्या वायुगळतीच्या घटनेनंतर सातत्याने घडणाऱ्या आगीच्या घटनांमुळे औद्योगिक सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्लॉट क्रमांक जे-१६२ येथील शिव इंडस्ट्रीजच्या आवारात उभ्या असलेल्या एलडीओने भरलेल्या टँकरना दिनांक १७ मार्च, २०२६ रोजी सकाळी ८.५० वाजता भीषण आग लागून झालेल्या ८ ते १० स्फोटांनी संपूर्ण परिसर हादरल्याने नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर औद्योगिक क्षेत्रातील आग भीषण असल्यामुळे पालघर नगरपरिषदेचा एक बंब तसेच अणुऊर्जा केंद्राचा एक बंब तसेच अग्निशामक बंब अशा एकूण पाच अग्निशामक बंबानी आणि जवानांनी आग आटोक्यात

आणली असली तरी धुरामुळे संपूर्ण परिसर बराच काळ अंधूक होता, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने तारापूर औद्योगिक क्षेत्रात सातत्याने होणारे स्फोट व आग लागणे या गोष्टी आटोक्यात आणण्यासाठी औद्योगिक क्षेत्रात प्रभावी अद्ययावत तंत्रज्ञान तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) अशंत: खरे आहे.

औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, पालघर कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार, पालघर जिल्ह्यातील बोईसर येथील तारापूर औद्योगिक क्षेत्रामध्ये सन २०२६ मध्ये अलिकडील कालावधीत वायुगळतीच्या ०३ घटना तसेच आगीच्या ०३ घटना घडल्या आहेत. सदर सर्व घटनांची चौकशी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत करण्यात आली आहे.
(२) व (३) अग्निशमन केंद्र अधिकारी, तारापूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मे. शिव इंडस्ट्रीज, प्लॉट क्र. जे-१६२, म.औ.वि. महामंडळ, तारापूर येथील कारखान्यामध्ये दि. १७/०३/२०२६ रोजी सकाळी ०८.४३ वाजता आग लागल्याची माहिती तारापूर अग्निशमन केंद्राच्या नियंत्रण कक्षास प्राप्त झाली. घटनास्थळी पोहोचल्यानंतर स्फोट झाल्याचे आढळून आले नाही.

सदर घटनेच्या ठिकाणी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अग्निशमन विभागाची ०३ अग्निशमन वाहने, पालघर नगरपरिषदेचे ०१ अग्निशमन वाहन तसेच बी.आर.सी. सर्व्हिसचे ०१ अग्निशमन वाहन अशा एकूण ०५ अग्निशमन वाहनांनी अग्निशमन कार्यात सहभाग घेतला. संबंधित अग्निशमन पथकाच्या प्रयत्नांमुळे सदर आग दुपारी सुमारे ०१.०० वाजेपर्यंत पूर्णपणे आटोक्यात आणण्यात आली.
(४) सदर प्रकरणी औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत विहित कालावधीत चौकशी करण्यात आली. चौकशीदरम्यान निदर्शनास आलेल्या सुरक्षा विषयक त्रुटींबाबत आवश्यक सुधारात्मक उपाययोजना सुचविण्यात आल्या असून त्यांची पूर्तता संबंधित कारखाना व्यवस्थापनाकडून करून घेण्यात आली आहे.

तसेच, तारापूर औद्योगिक क्षेत्रासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अद्ययावत अग्निशमन केंद्र स्थापन करण्यात आले आहे. आपत्कालीन परिस्थितीला प्रभावी प्रतिसाद देण्यासाठी सदर केंद्रात ०२ अधिकारी, १६ कर्मचारी, ०४ अग्निशमन वाहने व ०१ रुग्णवाहिका चोवीस तास उपलब्ध असतात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील आजारी व बंद पडलेल्या सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना पुनरुज्जीवन देण्याबाबत

**(२३) * ३२९७६ श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रातील आर्थिक मंदी, कोरोना महामारीनंतरची प्रतिकूल परिस्थिती, वाढलेले उत्पादन खर्च, वीज व इंधन दरवाढ तसेच कच्च्या मालाच्या वाढत्या किमतींमुळे मागील चार वर्षांत राज्यातील १२ हजारांहून अधिक लघु उद्योग बंद पडल्याची बाब निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नाशिक, सांगली, मिरज, कुपवाड, बामणोली, विदर्भ व मराठवाडा परिसरातील अनेक औद्योगिक वसाहतींमधील उद्योग वीज दरवाढ, गॅस टंचाई, आर्थिक संकट व धोरणात्मक अडचणींमुळे बंद पडण्याच्या मार्गावर असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आखाती देशांतील अस्थिर परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या गॅस टंचाईचा राज्यातील अंदाजे १० हजारांहून अधिक उद्योगांवर परिणाम झाला असून काही उद्योग पूर्णतः बंद पडण्याच्या स्थितीत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, राज्यातील वस्त्रोद्योग, पोलाद उद्योग तसेच इतर उत्पादनाधारित उद्योगांना वीज सवलती बंद होणे, वाढलेले संचालन खर्च व अपूऱ्या पायाभूत सुविधांमुळे मोठे नुकसान होत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, आजारी व बंद पडलेल्या उद्योगांचे पुनर्वसन, पुनरुज्जीवन तसेच त्यांना आर्थिक मदत, व्याज सवलत, वीजदर सवलत, गॅस पुरवठा सुनिश्चित करणे आणि कर सवलती उपलब्ध करून देण्याबाबत शासन कोणती उपाययोजना करीत आहे,
(६) असल्यास, बंद पडलेल्या उद्योगांमुळे बेरोजगार झालेल्या कामगारांचे पुनर्वसन, पर्यायी रोजगारनिर्मिती तसेच प्रभावित औद्योगिक क्षेत्रांसाठी विशेष पुनरुज्जीवन पॅकेज जाहीर करण्याबाबत तसेच राज्यातील विविध एमआयडीसी क्षेत्रांतील ज्या उद्योगांचे उत्पादनात घट होत आहे त्यांचे सर्वेक्षण व अडचणी दूर करुन स्वतंत्र कृती आराखडा तयार करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. उदय सामंत :** (१) अंशत: खरे आहे.

मागील चार वर्षांत राज्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) क्षेत्रातील काही उद्योग घटक बंद पडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.
(२) व (३) आखाती देशांतील युद्धजन्य परिस्थितीमुळे काही प्रमाणात एलपीजी गॅसची टंचाई उद्भवल्यामुळे काही उद्योगांच्या उत्पादन क्षमतेवर परिणाम झाला आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) गॅस पुरवठा सुनिश्चित करण्याच्या अनुषंगाने राज्य शासनाच्या अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या दि.१०/०४/२०२६ रोजीच्या पत्रान्वये जिल्हास्तरावरील व्यावसायिक एलपीजी गॅस वाटपाच्या प्राधान्य क्रमाचे क्षेत्र व वाटपाची टक्केवारी याबाबतच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तसेच, महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक व सेवा धोरण २०२५ दि.३१/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे जाहीर करण्यात आले आहे. सदर धोरणानुसार वित्त पुरवठा, जुने तंत्रज्ञान आणि पायाभूत सुविधेच्या अडचणी किंवा बाह्य आव्हानांमुळे आजारी किंवा बंद पडलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहेत. त्यात राज्यातील अशा उद्योगांचे सर्वेक्षण करणे, एक समर्पित एमएसएमई पुनरुज्जीवन आणि पुर्नवसन निधी स्थापन करणे, इनक्यूबेशन केंद्राव्दारे मार्गदर्शन करणे अंतर्भूत आहे.

याशिवाय, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, सुधारित बीज भांडवल योजना, जिल्हा उद्योग केंद्र कर्ज योजना सामुहिक प्रोत्साहन योजना, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामुहिक प्रोत्साहन योजना इत्यादी योजनेतंर्गत विद्युत शुल्क माफी, व्याज दर अनुदान, औद्योगिक प्रोत्साहन अनुदान इत्यादी प्रोत्साहने दिली जातात.

तसेच, पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी शासनाकडून विविध उपाययोजना केल्या जातात.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयामार्फत शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांमध्ये यांत्रिक वस्त्रधुलाई सेवा उभारण्याच्या निविदा प्रक्रियेबाबत**

**(२४) * ३८२५९ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालयामार्फत (DMER) शासकीय रुग्णालयांसाठी काढण्यात आलेल्या सुमारे रु.२४० कोटी इतक्या रुक्कमेच्या यांत्रिक वस्त्रधुलाई सेवा (Mechanized Laundry) निविदेत (Tender ID: २०२६_MERDM_१२७७८४२_१) तांत्रिक मूल्यमापन करण्याच्या नावाखाली एकूण ८ निविदाधारकांपैकी (बिडर्स) ६ निविदाधारकांना (बिडर्सना) अपात्र ठरविण्यात आले असल्याचे माहे एप्रिल, २०२६ च्या उत्तरार्धात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदेमध्ये वार्षिक आर्थिक उलाढाल (Turnover) आणि इतर पात्रता निकष जाणिवपूर्वक जाचक व अवास्तव ठेवल्यामुळे 'रयत स्वयंरोजगार संस्था' व 'श्री छत्रपती शिवाजी महाराज संस्था' यांसारख्या स्थानिक कामगार सहकारी संस्था आणि लघु उद्योग (SMEs) या प्रक्रियेतून पूर्णपणे बाद व्हावेत असे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सहा बिडर्सना पद्धतशीरपणे अपात्र ठरवून स्पर्धा संपविल्यामुळे अंतिम आर्थिक बोलीमध्ये केवळ दोनच कंपन्या शिल्लक राहिल्या आणि त्यातील 'L१' ठरलेली 'स्मार्ट सर्व्हिसेस प्रा. लि.' त्यांना फायदा पोहोचविण्यासाठीच ही स्पर्धात्मक कोंडी निर्माण करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या सेवांचे 'विकेंद्रीकरण' करून प्रत्येक रुग्णालय किंवा जिल्हा स्तरावर स्थानिक संस्थांना कंत्राट देण्याऐवजी, मुख्य बजेट हेड २२१० (वैद्यकीय आणि सार्वजनिक आरोग्य) मधील कोट्यवधी रुपयांचा निधी केंद्रीय पद्धतीने थेट एकाच बड्या कॉर्पोरेट कंपन्याकडे दिल्यामुळे राज्याच्या सार्वजनिक पैशांचे आणि स्थानिक रोजगाराचे मोठे नुकसान होणार आहे,हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन निकोप स्पर्धा डावलून काढण्यात आलेल्या या संशयास्पद निविदा प्रक्रियेला स्थगिती देऊन याची लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत (ACB) चौकशी करण्यासह ही संपूर्ण प्रक्रिया 'विकेंद्रित' पद्धतीने राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. हसन मुश्रीफ :** (१) विभागाच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये संचालनालयाच्या अधिपत्याखालील रुग्णालयांमध्ये यांत्रिक वस्त्रधुलाई (Mechanized Laundry) सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संचालनालयस्तरावर निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुषंगाने संचालनालय स्तरावर प्रसिद्ध करण्यात आलेल्या मेकॅनाइज्ड लॉन्ड्री सेवेसाठीच्या निविदा प्रक्रियेमध्ये एकूण ८ निविदाकारांनी सहभाग नोंदविला होता. त्यापैकी ७ निविदाकारांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्यामुळे त्यांना दिनांक ०५/०४/२०२६, २७/०४/२०२६, ३०/०४/२०२६ व ०४/०५/२०२६ रोजी ई-मेलद्वारे आवश्यक कागदपत्रे सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. तथापि, त्यापैकी केवळ एका निविदाकाराने आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्याने उर्वरित ६ निविदाकारांना अपात्र घोषित करण्यात आले.

(२) नाही.

निविदेमधील आर्थिक उलाढालीसंबंधीचे निकष केंद्रीय दक्षता आयोगाच्या (CVC Guidelines) मार्गदर्शक तत्त्वांनुसार निश्चित करण्यात आले होते. तसेच, पात्रता निकष तयार करताना पश्चिम रेल्वेमार्फत वस्त्रधुलाई सेवेसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या निविदेतील अटी व शर्ती तसेच टाटा कॅन्सर रुग्णालयमार्फत वस्त्रधुलाई सेवेसाठी अवलंबिण्यात आलेल्या अटी व शर्तींचा संदर्भ घेऊन त्यांचा आधार म्हणून वापर करण्यात आला.

(३) नाही.
(४) नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) लागू नाही.

-----------------

**छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा, बिडकीन व वाळूंज या औद्योगिक क्षेत्रांच्या दळणवळणाबाबत**

**(२५) * ३७६०३ श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील शेंद्रा, बिडकीन आणि वाळूज हे तीन औद्योगिक क्षेत्रे परस्परांना थेट रस्तामार्गाने जोडलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर त्रिकोणी औद्योगिक क्षेत्रांना एकमेकांना जोडण्यासाठी नवीन रस्ता विकसित करण्यासाठी कोणता प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे,
(३) असल्यास, सदर रस्ता प्रकल्पासाठी चालू अर्थसंकल्पीय वर्षात किंवा आगामी वर्षासाठी किती अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे,
(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने औद्योगिक क्षेत्रांच्या दळणवळण सुलभतेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शिवेंद्रसिंहराजे अभयसिंहराजे भोसले :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर तीन औद्योगिक क्षेत्रांना परस्परांशी जोडण्यासाठी शेंद्रा-बिडकीन, बिडकीन-ढोरेगाव या सहापदरी ग्रीनफिल्ड रस्ता बांधण्याच्या प्रस्तावास राज्य शासनामार्फत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.
(३)सदर ग्रीनफिल्ड रस्त्यांच्या भूसंपादन व बांधकामासाठी सन २०२६-२७ या अर्थसंकल्पीय वर्षात एकूण रु.११८.३६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे.
(४) सदर प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल आणि सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असून निश्चित करण्यात आलेल्या आखणीनुसार भूसंपादनाची प्रक्रिया गतीने राबवून प्रत्यक्ष बांधकाम सुरु करण्यात येईल.

-----------------

**राज्यात "क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन" योजनेतंर्गत नियमित अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादरीकरणाची प्रक्रिया सुलभ व सक्तीची करण्याबाबत**

**(२६) * ३२६७७ श्री.राजेश क्षिरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सुमारे दीड लाख मुले "क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन" योजनेचे लाभार्थी असून माहे एप्रिल, २०२५ पासून अनेक लाभार्थ्यांच्या खात्यात सदर योजनेंतर्गत मिळणारे अनुदान जमा झालेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक लाभार्थी मुलांची प्रकरणे मंजुरीसाठी सादर करून एक ते दोन वर्षे उलटूनही नियमित अनुदान जमा न झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, गुहागर (जि. रत्नागिरी) तालुक्यात या योजनेतंर्गत शाळांकडून केवळ याद्या पाठवून प्रस्ताव सादर न केल्यामुळे पात्र असलेल्या २०३ विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नसल्याचे माहे एप्रिल,२०२६ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या योजनेतील लाभार्थ्यांची माहिती उपलब्ध असूनही प्रस्ताव तयार करण्याबाबत शिक्षकांना योग्य मार्गदर्शन नसणे तसेच संबंधित शाळा, शिक्षक किंवा अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होणे, तालुका स्तरावर गटशिक्षणाधिकारी आणि महिला व बालकल्याण विभाग यांच्यात समन्वय नसणे इ.कारणामुळे विद्यार्थ्यांचे प्रस्ताव प्रलंबित रहात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार पात्र लाभार्थ्यांचे प्रस्ताव सादर करण्यास दिरंगाई करण्याऱ्या संबंधितांवर जबाबदारी निश्चित करणेसह प्रलंबित अनुदान तत्काळ वितरित करणे व भविष्यात नियमित अनुदान मिळणेसाठी प्रस्ताव सादरीकरणाची प्रक्रिया सुलभ व सक्तीची करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**कुमारी आदिती तटकरे :** (१) व (२) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान वितरीत करण्यासाठी शासन निर्णय दि. ५/६/२०२६ अन्वये निधी वितरीत करण्यात आला असून सदर निधी DBT प्रणाली द्वारे लाभार्थ्यांच्या खात्यात जमा करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजनेकरीता लाभार्थ्यांमार्फत विहीत नमुन्यात सर्व कागदपत्रांसह सविस्तर परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांच्या कडे प्राप्त झाल्यानंतर सदर प्रस्तावाची छाननी करुन पात्र लाभार्थ्यांना बालसंगोपन योनजेचा लाभ दिला जातो.

तथापि, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा रत्नागिरी यांनी गुहाघर तालुक्यातील एकूण २०५ मुलांचे परिपूर्ण प्रस्ताव जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्या कार्यालयाकडे सादर न करता फक्त यादीच सादर केली. परंतू सदर यादी प्राप्त होण्यापूर्वीच या २०५ मुलांपैकी ४८ मुलांनी स्वत:हून आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास सादर केला होता. त्यानुसार त्या सर्व ४८ लाभार्थ्यांचे प्रस्ताव विहीत पध्दतीने मंजूर करण्यात आले आहेत.
(४) व (५) महिला व बाल विकास विभागाकडून बालसंगोपन योजनेचा दि. ३०/५/२०२३ रोजीचा शासन निर्णय शिक्षण अधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, रत्नागिरी व गट शिक्षण अधिकारी, गुहागर यांना उपलब्ध करुन दिला आहे. तसेच लाभार्थ्यांचे परिपूर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत योग्य ते मार्गदर्शन करण्यात आले आहे. सदर शासन निर्णयात या योजनेची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी विस्तृत व सुलभ प्रक्रीया नमूद करण्यात आली आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात आयुष्यमान भारत, महात्मा फुले जनआरोग्य योजनेतंर्गत रुग्णालयांकडून रोखरहीत उपचार सुनिश्चित करणेबाबत

**(२७) * ३८२६१ डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयाने केलेल्या सर्वेक्षणानुसार राज्यात आयुष्मान भारत, महात्मा फुले जनआरोग्य योजनेंतर्गत मोफत उपचाराची तरतूद असतानाही रुग्णांना उपचाराच्या एकूण खर्चापैकी सुमारे ९० टक्के खर्च त्यांना स्वतःलाच करावा लागत असल्याचे माहे मे, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व राज्यांपैकी महाराष्ट्रात आरोग्य सेवेचे सर्वाधिक खाजगीकरण झाले असून सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेचा वापर केवळ १८.६ टक्के इतकाच मर्यादित राहिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासकीय रुग्णालयांमध्ये डॉक्टर आणि आरोग्य कर्मचाऱ्यांची कमतरता, तपासण्यांमध्ये होणारा विलंब, अपुरा औषधसाठा, खाटांची कमतरता आणि वाढती गर्दी यामुळे सुमारे ८० टक्के रुग्ण खासगी रुग्णालयांकडे

उपचाराकरिता जातात, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार राज्यातील सरकारी आरोग्य सुविधा बळकट करण्यासाठी महात्मा फुले जनआरोग्य योजना व आयुष्मान भारत योजनेंतर्गत रुग्णालयांकडून रोखरहित उपचार सुनिश्चित करणे, प्रभावी नियंत्रण यंत्रणा उभारणे व अंगीकृत खाजगी रुग्णालयांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि दोषी रुग्णालयांचे परवाने रद्द करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रकाश आबिटकर :** (१) व (२) होय, हे अंशतः खरे आहे. अशा आशयाची बातमी दिनांक २४ मे, २०२६ रोजी लोकसत्ता या वर्तमानपत्रामध्ये प्रसिद्ध झालेली आहे.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीत असलेल्या आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकारी गट- अ व इतर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे आहेत. परंतू आरोग्य संस्थांमध्ये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत रूग्णांची तपासणी करून औषधोपचार करण्यात येतो. विशेषज्ञ उपलब्ध नसल्यास राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विशेषज्ञांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात आलेल्या आहेत. ग्रामीण/ उपजिल्हा रूग्णालयांमधून काही रूग्णांना विशेषोपचारासाठी जिल्हा रूग्णालय किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे पुढील उपचारासाठी संदर्भित करण्यात येते.
(४) सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.२८ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये एकत्रित आयुष्यमान-भारत जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना राज्यातील सर्व नागरिकांसाठी रोख रक्कम विरहित, प्रति कुटूंब प्रति वर्ष रु. ५ लक्ष रक्कमेच्या मर्यादेत दि. १ जुलै, २०२४ पासून हमी तत्वावर राबविण्यात येत आहे. दि. ४ नोव्हेंबर, २०२५ च्या शासन निर्णयान्वये सुधारित दरांसहित निश्चित केलेल्या एकूण २३९९ उपचारांना मान्यता देण्यात आली असून हे सर्व उपचार लाभार्थ्यांना अनुज्ञेय आहेत. शासन निर्देशानुसार योजना राष्ट्रीय आरोग्य प्रधिकरणाच्या TMS २.० प्रणालीवर दि.२४ फेब्रुवारी, २०२६ पासून राज्यातील सर्व अंगिकृत रुग्णालयांमध्ये कार्यान्वित करण्यात आली आहे. TMS २.० प्रणालीवर संगणकीकृत फसवणुकीचे दावे विरोधी यंत्रणा उपलब्ध आहे.अंगीकृत रुग्णालय, अंमलबजावणी सहाय्य संस्था व राज्य आरोग्य हमी सोसायटी यांच्यामध्ये झालेल्या त्रिस्तरीय करारनाम्यातील तरतुदीनुसार आवश्यकतेप्रमाणे अंगीकृत रुग्णालयांवर कारवाई केली जाते.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.